सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# झेडपी-पंचायत समितींच्या निवडणुकांची घोषणा

## १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितींसाठी ५ फेब्रुवारीला होणार मतदान

**मुंबई :** राज्यातील रखडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी १२ जिल्हा परिषदा आणि त्यांच्याअंतर्गत असलेल्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून, ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांना या टप्प्यातून वगळण्यात आले असून, संबंधित भागात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या जाणार आहेत. या निवडणुकांत जिल्हा परिषदेच्या एकूण ७३१ जागा आणि पंचायत समितीच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान होणार असून, प्रत्येक मतदाराला दोन स्वतंत्र मते द्यावी लागणार आहेत.



संबंधित जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या घोषणा, निर्णय किंवा जाहिराती करता येणार नाहीत. मात्र नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने मदतकार्य सुरू ठेवता येईल. आयोगाने नोव्हेंबर २०२५ मध्ये जारी केलेल्या आदेशांनुसार सर्व नियम काटेकोरपणे पाळावे लागणार आहेत. निवडणूक प्रचार ३ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता थांबेल. मतदानाच्या २४ तास आधी कोणत्याही माध्यमातून प्रचारास बंदी राहील.

**७ फेब्रुवारीला मतमोजणी; आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या 20 जिल्हा परिषदांना वगळले**

या निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजीची विधानसभा मतदार यादी आधार मानण्यात आली आहे. दुबार नावे आढळल्यास ती (**) चिन्हाद्वारे दर्शवली जाणार आहेत. मतदारांच्या सोयीसाठी 'मताधिकार' हे मोबाइल प उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याद्वारे मतदार यादी, मतदान केंद्र व उमेदवारांची माहिती मिळू शकते. तसेच अधिकृत संकेतस्थळावरूनही नाव शोधण्याची सुविधा आहे.

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला तसेच लहान मुलांसह येणाऱ्या महिलांना मतदान केंद्रावर प्राधान्य देण्यात येईल. मतदान केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, पाणी, वीज, सावली व शौचालय अशा मूलभूत सुविधा उपलब्ध असतील. ज्या केंद्रांवर महिला मतदारांचे प्रमाण अधिक आहे, तेथे सर्व कर्मचारी व पोलीस महिला असतील. अशा केंद्रांना 'सखी मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. या निवडणुकांसाठी सुमारे २५,४८२ मतदान केंद्रे उभारली जाणार असून, ५१,५३७ कंट्रोल युनिट आणि १,१०,३२९ बॅलट युनिट्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

**संपूर्ण निवडणूक कार्यक्रम**

नामनिर्देशन स्वीकारणे-१६ जानेवारी ते २१ जानेवारी, उमेदवारी अर्जांची छाननी - २२ जानेवारी २०२६, अर्ज माघारीची अंतिम मुदत - २७ जानेवारी दुपारी ३ पर्यंत, अंतिम उमेदवार यादी व चिन्हवाटप - २७ जानेवारी दुपारी ३.३० नंतर, मतदान ५ फेब्रुवारी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत, मतमोजणी ७ फेब्रुवारी सकाळी १० वाजता पासून.

७३१ जिल्हा परिषद जागांपैकी ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांच्या मागासवर्गासाठी १९१ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तर, पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांपैकी ७३१ महिला, १६६ अनुसूचित जाती, ३८ अनुसूचित जमाती आणि ३४२ मागासवर्गासाठी आरक्षित आहेत. आरक्षित जागांसाठी उमेदवारांना जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास अर्ज केल्याचा पुरावा देता येईल; मात्र निवडून आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र सादर न केल्यास निवड रद्द होणार आहे.

---

## थोडक्यात...

### नालासोपाऱ्यातील पकडलेल्या पैसा प्रकरणात मोठा खुलासा

**मुंबई :** नालासोपाऱ्यात पकडलेले पैसे हे एका फॉर्च्युनर गाडीतून आले होते. फोर्च्युनर गाडीवर शिवसेना जिल्हाध्यक्ष असे लिहिलेले होते. त्याच फॉर्च्युनर गाडीतूनअक्टिव्हा चालकाना पैशाची पिशवी दिली असल्याचा आरोप वॉर्ड क्रमांक १९ चे बविआ चे उमेदवार प्रफुल्ल पाटील यांनी केला आहे. एक्टिव्हा गाडीत दोन पिशव्या होत्या. एका पिशवीत प्रभाग निहाय पदाधिकारी यांचे नाव तर दुसऱ्या पिशवीवर भाजपा चे नाव लिहिलेले होते. त्यात ५२ पांढऱ्या कलरचे पैशाचे पॉकेट होते. कार्यकर्त्यांनी पैसे घेवून जाणाऱ्या दोन्ही अक्टिव्हा चालकाना पकडून गस्तीवरील पोलिसांच्या ताब्यात दिले असता त्यात १० लाख ९ हजार रुपये निघाले असल्याचा दावा ही प्रफुल्ल पाटील यांनी केला आहे.

### पैसे वाटपाची यादीच व्हायरल

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहरात बेगमपुरा भागात मनपा निवडणुकीत पैसे वाटपा वरून आगळा गोंधळ दिसून आला. पैसे वाटपासाठी करण्यात आलेली एक यादी सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्या प्रभागातील तरुणांनी फोटोतील यादी करणाऱ्या व्यक्तीचे घर शोधले.त्या व्यक्तीला जाब विचारला सुरुवात केली.काही तरुणांनी एकत्र येत त्या व्हायरल यादीचे बॅनर लावले. शेकडो लोकांनी यादी करणाऱ्यांनी संताप केला.

### जळगावात पैसे वाटपाचा व्हिडिओ व्हायरल

**जळगाव :** जळगावात पैसे वाटप करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला असून या व्हिडिओबाबत अपक्ष उमेदवारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. प्रभाग ११ मधील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून मतदारानां मतदानासाठी पैसे वाटप केले जात असल्याचं लेखी तक्रारीत नमूद आहे. पैसे दिल्यावर मतदान कसं आणि कुणाला करावं याबाबत देखील डेमो दिला जात असल्याचं व्हिडिओमध्ये पहायला मिळत आहे.

### आप उमेदवारावर बंदूक ताणली

**नाशिक :** नाशिकच्या सातपूर भागात प्रभाग ११ मध्ये प्रचारादरम्यान आम आदमी पक्षाचे उमेदवार समाधान आहेर यांच्यावर बंदूक ताणून त्यांना धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रचाराला फिरू नकोस असे धमकावत एका तरुणाने बंदूक काढली, मात्र तिथे उपस्थित असलेल्या संतप्त जमावाने त्याला पकडून चांगलेच चोपले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. बंदूक ताणणारा युवक हा जेलमधून निवडणूक लढवणारे आरपीआय जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांचा कार्यकर्ता असल्याचा गंभीर आरोप आम आदमी पक्षाने केला आहे.

### ज्येष्ठांना मतदान केंद्रावरच जावे लागणार

**मुंबई :** ७५ वर्षांवरील नागरिकांना यावेळी घरोघरी मतदानाची सुविधा नाही.यामुळे वृद्ध मतदारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गर्दीमुळे टक्का घसरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निवडणूक आयोगाने व्हीलचेअर सह विविध सुविधा उपलब्ध केल्या आहेत. दिव्यांग व गर्भवती महिलांसाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

### भाजप-शिवसेना गटात तुंबळ हाणामारी

**डोंबिवली :** डोंबिवलीच्या पॅनल क्रमांक २९ मध्ये काल रात्री पैसे वाटप चा आरोप करत राडा झाला होता. हाणामारीत उमेदवार सह चार जण जखमी असून पोलीस गुन्हा दाखल करणीची प्रक्रिया सुरू आहे. याआधी देखील भाजपच्या चार कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप सुरू असल्याचा आरोप करत याच परिसरात गोंधळ झाला होता. काल पुन्हा या ठिकाणी भाजप शिवसेना उमेदवारांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये आधी शिवीगाळ नंतर थेट हाणामारी झालेली व्हिडीओ व्हायरल होत आहे.

### अजित पवारांचे शक्तिप्रदर्शन

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा आज अंतिम दिवस आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचाराच्या मैदानात जोरदार एन्ट्री केली आहे. आज अजित पवार प्रभाग क्रमांक ३४, ३२ आणि ८ मध्ये भव्य रोड शो करत असून, त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात मतदारांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पूर्ण ताकद झोकून दिली आहे. या रोड शोच्या माध्यमातून अजित पवार पुण्याच्या विकासाचा अजेंडा मतदारांपर्यंत पोहोचवत असून, आजचा हा शेवटचा दिवस पुण्याच्या राजकीय वातावरणात मोठी चुरस निर्माण करणारा ठरणार आहे.

### राज्यातील १०७ परीक्षा केंद्र रद्द

**पुणे :** राज्यातील १०७ परीक्षा केंद्र रद्द करण्यात आल्या आहेत. गैरप्रकार आढळल्याने केंद्रावर राज्य मंडळाची कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परीक्षेत यापूर्वी काही प्रकार झालेल्या परीक्षा केंद्रावर कारवाईचा बडगा उभारण्यात आला आहे. त्यानुसार राज्यभरातील दहावीची ३१ बारावीची ७६ केंद्राची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यात परीक्षा केंद्र छत्रपती संभाजी नगर विभागातील आहेत.

---

# 'आप'च्या उमेदवाराला पिस्तूल दाखवून धमकावलं

**नाशिक :** नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत गुंडगिरीने डोके वर काढले असल्याचा आरोप होऊ लागले आहेत. सातपूर परिसरातील प्रभाग क्रमांक ११ मध्ये खळबळजनक घटना घडली आहे. आम आदमी पक्षाचे (आप) उमेदवार समाधान आहेर यांच्यावर प्रचारादरम्यान एका तरुणाने थेट बंदूक ताणून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून निवडणुकीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, समाधान आहेर हे आपल्या कार्यकर्त्यांसह घरोघरी जाऊन प्रचार करत असताना ही घटना घडली. एका अज्ञात तरुणाने अचानक त्यांच्यासमोर येऊन पिस्तूल बाहेर काढले आणि प्रचाराला फिरायचे नाही, असा दम भरला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण होते, मात्र नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रसंगावधान राखत त्या तरुणाला जागीच पकडले आणि चोप दिला.

या प्रकरणात आम आदमी पक्षाने अत्यंत गंभीर दावा केला आहे. बंदूक दाखवणारा तरुण हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप 'आप'ने केला आहे. विशेष म्हणजे, प्रकाश लोंढे हे सध्या जेलमध्ये असून तिथूनच निवडणूक लढवत आहेत. या आरोपामुळे नाशिकमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

---

# १० फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी सूचना जारी केली आहे. १० फेब्रुवारी २०२६ पासून बारावीच्या लेखी परीक्षेला सुरूवात होईल. बारावीच्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिट वाटप करण्यास सुरूवात झाली. राज्यात बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत चालणार आहेत.

बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने हॉल तिकिट दिले जाणार आहे. मात्र, महाविद्यालयांना मंडळाने सूचना दिल्या आहेत की, त्यांना हे हॉल तिकिटे विद्यार्थ्यांना प्रिंट काढून द्यावीत. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थी हॉल तिकिटांची वाट पाहत होते. आता त्यांना हॉल तिकिट वाटप करण्यास सुरूवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांना हॉल तिकिटचे प्रिंट काढून देण्यासाठी महाविद्यालयांना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता येणार नाही. फक्त ऑनलाईन पद्धतीने हॉल तिकिट काढून चालणार नाही तर विद्यार्थ्यांना त्या हॉल तिकिटवर मुख्याध्यापकांची सही देखील घ्यावी लागणार



आहे. एखाद्या विद्यार्थ्याच्या हॉल तिकिटवर मुख्याध्यापकांची सही नसेल तर त्याला परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारला जाऊ शकतो. हॉल तिकिटवर विद्यार्थ्याचा फोटो असेल त्याच्या बरोबर खाली मुख्याध्यापकांची सही शिक्का असल्यावरच हे हॉल तिकिट ग्राह्य धरले जाईल.

बारावीची परीक्षा देण्याकरिता विद्यार्थ्यांकडे हॉल तिकिट असणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थ्याल परीक्षेला बसता येणार नाही. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर, मुंबई, नाशिक, लातूर, अमरावती, कोकण, मुंबई या ९ विभागांकडून घेतली जाईल. बारावीच्या परीक्षेसोबतच दहावीच्या परीक्षेचेही हॉल तिकिट विद्यार्थ्यांना

**विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने हॉल तिकिट दिले जाणार**

लवकरच मिळणार आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा या कॉपी मुक्त घेण्यासाठी मंडळाकडून प्रयत्न केली जात असून याच पार्श्वभूमीवर राज्यातील दहावीचे ३१ तर बारावीच्या ७६ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. सर्वाधिक कारवाई करण्यात आलेली परीक्षा केंद्रे ही छत्रपती संभाजीनगर विभागातील असल्याचीही माहिती मिळत आहे. कॉपीमुक्त अभियान राज्यभर राबवले जात आहे. भरारी पथकांचीही संख्या वाढवली आहे. हेच नाही तर विद्यार्थ्यांवर सीसीटीव्हीने वॉच ठेवला जाईल.

---

# नाशिकमध्ये माजी महापौरांसह ५४ जणांची भाजपमधून हकालपट्टी

**नाशिक :** नाशिक महापालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे दोन दिवस शिल्लक असतानाच भाजपने शहराच्या राजकारणात खळबळ उडवणारी कारवाई करत माजी महापौरांसह तब्बल ५४ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. उमेदवारी न मिळाल्याने भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करणाऱ्या आणि अपक्ष किंवा इतर पक्षांकडून निवडणूक लढवणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई भाजपच्या नाशिकमधील इतिहासातील सर्वात मोठी हकालपट्टी मानली जात आहे.

नाशिक महापालिका निवडणुकीत पक्षशिस्त मोडून अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणाऱ्या २० माजी नगरसेवकांसह एकूण ५४ जणांना भाजपने पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. विशेष म्हणजे, या यादीत माजी महापौरांचाही समावेश असल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

शहराध्यक्ष सुनील केदार यांना घेराव घालून निषेध म्हणून त्यांना गाजर देण्यात आले होते. बंडखोरी रोखण्यासाठी भाजपने समेटाचे अनेक प्रयत्न केले, मात्र सर्व बंडखोरांना थांबवण्यात पक्षाला यश आले नाही.

**पक्षशिस्त मोडल्याने कारवाई : केदार**

या संदर्भात भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांनी स्पष्ट केले की, पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणे, तसेच अपक्ष किंवा इतर पक्षांकडून उमेदवारी स्वीकारणे ही गंभीर पक्षशिस्तभंगाची बाब आहे. त्यामुळे संबंधितांवर हकालपट्टीची कारवाई करण्यात आली आहे.

---

# सासरच्या छळास कंटाळून विवाहितेची आत्महत्या



**बीड :** बीडच्या केज तालुक्यातील उंदरी या गावामध्ये एका २५ वर्षे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणात युसुफ वडगाव पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुणा ठोंबरे असं आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. अरुणाला तीन मुली आहेत. मुलगा होत नसल्याने सासरच्या लोकांकडून तिचा छळ केला जात होता. पती उद्धव ठोंबरे हा दारू पिऊन अरुणाला मारहाण करीत होता. तसेच सासू-सासर्याकडून देखील छळ केला जात होता. यामुळेच दिनांक १० जानेवारी रोजी दुपारी अरुणा ठोंबरे हिने घरातील पंख्याला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी अरुणाचा भाऊ गोविंद सूर्यवंशी याच्या तक्रारीवरून वडगाव पोलीस ठाण्यात पती उद्धव ठोंबरे, इंदुबाई ठोंबरे आणि सासरा उत्तम ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# तहसीलमध्ये चौघांचा आत्मदहनाचा प्रयत्न

## महसूल अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून उचलले टोकाचे पाऊल

**बीड :** बीड जिल्ह्यातील केज तहसील कार्यालयात एका कुटुंबाने महसूल अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच पोलीस प्रशासनाने प्रतिबंध केल्याने मोठा अनर्थ टळला.



केज न्यायालयाच्या आदेशानुसार जमिनीची मोजणी करून सीमांकन दाखविण्याचे तहसीलदारांचे आदेश असतानाही मंडळ अधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कर्मचाऱ्याला सहकार्य न केल्याने लांडगे कुटुंबातील चौघांनी काल केज तहसील कार्यालयाच्या दारातच अंगावर डिझेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

केज-बीड राष्ट्रीय महामार्गालगतच्या गायरान जमिनीतील वडिलोपार्जित जमीन लांडगे कुटुंबाकडे वहिवाट आहे. त्यांना या जमिनीचा ताबा मिळालेला नाही. जमिनीची मोजणी करून सीमांकन करून देण्यासाठी तहसीलदारांनी ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व भूमी अभिलेख कार्यालयाचे मोजणी कर्मचाऱ्यांना १२ जानेवारी रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर हजर राहून कार्यवाही करीत अहवाल तहसील कार्यालयाला पाठविण्याचे आदेश दिले होते. परंतु मंडळ अधिकाऱ्यांनी मोजणी करताना सहकार्य केले नसल्याने लांडगे कुटुंबातील चार जणांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला.



लातूर

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** नुकतीच महाविद्यालयांमध्ये स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विरभद्र बाळे, निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील, इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सौ. शारदा मुद्दा, संगणक विभाग प्रमुख डॉ. एन. एम. हलगरे तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा. ऋषिकेश दुधनी उपस्थित होते. सुरुवातीला प्रतिमा पुजन झाल्यानंतर प्रा. ऋषिकेश दुधनी यांनी प्रास्ताविक सादर करत आत्मषटकाचे पठन केले. त्यानंतर इतर मान्यवराची समयोच्चित भाषणे झाली. प्रा. श्रीकांत तांदळे यांनी सर्व उपस्थितांना योगा बद्दल माहिती दिली व प्रात्यक्षिक ही करून घेतले.






# मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज : मानसी मीना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि पारदर्शक प्रक्रिया पार पाडावी, यासाठी शहरातील एकूण ३७५ मतदान केंद्रांपैकी १५० केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, संपूर्ण प्रक्रियेवर डिजिटल वॉच ठेवला जाणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त मानसी मीना यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, आचारसंहिता कक्षाच्या प्रमुख उपजिल्हाधिकारी श्रीमती कासोदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी आयुक्त मानसी मीना म्हणाल्या, शहरात एकूण मतदार ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आहेत. यात पुरुष मतदार १ लाख ६४ हजार १५२, तर महिला मतदार १ लाख ५७ हजार १७१ आहेत. पोलीस प्रशासनाने दिलेल्या अहवालानुसार, लातूर शहरात एकूण ९९ केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने या सर्व ९९ संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. याशिवाय, ज्या इमारतींमध्ये मतदारांची मोठी गर्दी होते किंवा जिथे एकाच ठिकाणी जास्त मतदान केंद्रे आहेत, त्या ठिकाणीही सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेण्यात येणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आणि शांततेत प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्विप कक्षाच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

निवडणूक कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी प्रयत्न केल्याचे सांगून आचारसंहितेचे पालन करण्याचाही यशस्वी प्रयत्न केला गेला. निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदारांसाठी आवश्यक त्या सुविधाही मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे आयुक्त मीना यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात म्हणजेच मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी. त्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. बुधवार, दि. १४ जानेवारी ते दि. १६ जानेवारी २०२६ या कालावधीत बार्शी रोडवरील पीव्हीआर चौक ते बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे.

महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड येथे निवडणूक साहित्याचे वाटप, संकलन आणि मतमोजणी होणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. नागरिकांनी याकामी प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## निवृत्त अधिकाऱ्याची ऑनलाइन फसवणूक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर शहरातील एका निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव रचून सायबर भामट्यांनी तब्बल ७१ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी स्वतःला तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून पीडितावर मानसिक दबाव टाकत विविध बँक खात्यांत रक्कम वर्ग करण्यास भाग पाडले.

या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच ॲड.राहुल शेल्लाळे यांनी तात्काळ हस्तक्षेप करत पीडितास सायबर हेल्पलाईन वर त्वरित तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला व त्यांनी आवश्यक ती सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, फिर्यादी-पीडिताची बाजू न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडली. न्यायालयाच्या आदेशानुसार ४० लाख ६३ हजार ८७० रुपयांची रक्कम फिर्यादीस परत मिळण्यात यश आले. सायबर गुन्हेगार नागरिकांना भीती दाखवून 'डिजिटल अरेस्ट'सारख्या बनावट प्रकारांद्वारे फसवत आहेत. अशा वेळी घाबरून न जाता तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य वेळी तक्रार आणि कायदेशीर प्रक्रिया केल्यास फसवलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता नक्कीच असते. नागरिकांनी कोणत्याही धमकीला बळी न पडता कायद्यावर विश्वास ठेवावा, असे आवाहन ॲड. राहुल शेल्लाळे यांनी केले आहे.

## कुख्यात टोळीवर हद्दपारीची कडक कारवाई

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर जिल्ह्यातील एका कुख्यात गुन्हेगारांच्या टोळीवर हद्दपारीची कार्यवाही करण्यात आली आहे. हद्दपारीचा आदेश पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी निर्गमित केला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सदरचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यातील नागरिकांचे जीवन, मालमत्ता व सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सदैव कटिबद्ध असून, समाजात दहशत निर्माण करणाऱ्या व सतत गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ईश्र्वर गजेंद्र कांबळे, वय २३ वर्षे, रा. जय नगर, लातूर, विकास उर्फ विक्की गजेंद्र कांबळे, वय २५ वर्षे, रा. जय नगर, लातूर व प्रफुल श्रीमंत गायकवाड, वय २९ वर्षे, रा. सिद्धार्थ सोसायटी, लातूर या तिघांवर ही कार्यवाही केली आहे.

या तिन्ही व्यक्ती विरुद्ध पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर येथे जबरी चोरी, दरोडा, शस्त्राचा धाक दाखवून लूटमार, धमकी देणे, टोळी बनवून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांचा गुन्हेगारी अभिलेख पाहता ते सातत्याने संघटित पद्धतीने गुन्हे करीत असून, त्यांच्या कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती, दहशत व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे.

या टोळीविरुद्ध यापूर्वी वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई (कलम १०७ सीआरपीसी, १२९ बीएनएसएस इ.) करण्यात आली होती. मात्र, या सर्व कारवायांनंतरही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली दिसून आली नाही. त्यामुळे नागरिक दहशतीखाली जीवन जगत असून, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील व त्यांच्या टीम मधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, रवी गोंदकर, रणवीर देशमुख, सचिन राठोड, यशपाल कांबळे, धैर्यशील मुळे यांनी नमूद आरोपी विरुद्ध हद्दपारचा सविस्तर प्रस्ताव तयार करून तो पोलीस अधीक्षकांकडे पाठवण्यात आला होता. त्याअन्वये सदर तिन्ही इसमांना लातूर जिल्हा,नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड, देगलूर तालुके, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव, उमरगा, कळंब तालुके, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुका या सर्व हद्दीतून दोन वर्षांच्या कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

## शासकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग उद्या बंद राहणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

# जनगणनेचे काम गांभीर्याने करा : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** केंद्र शासनाने २०२७ मध्ये जनगणना करण्याचा निर्णय

### घर यादी, गटांची रचनाबाबत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

घेतला आहे. त्या अनुषंगाने जनगणना संचालनालयामार्फत प्रशिक्षण व पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामध्ये देण्यात येणाऱ्या माहितीनुसार सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यवाही करावी. जनगणनेची कार्यवाही अचूक होण्यासाठी सर्वांनी गांभीर्याने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित भारतीय




जनगणना २०२७ विषयक प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. मुंबई येथील जनगणना संचालनालयाचे सहाय्यक संचालक प्रवीण भगत, जनगणना संचालनालायचे अरुण साळगावकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सायली ठाकूर, तहसीलदार वर्षा मनाळे यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

समाजातील घटकांच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन करताना जनगणनेचा अहवाल उपयुक्त ठरतो. या माहितीच्या आधारे विविध योजना, विकासाची दिशा निश्र्चित केली जाते. त्यामुळे आगामी जनगणना अचूक होण्यासाठी सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी.

प्रथमच जनगणना डिजिटल स्वरुपात होत असून त्यादृष्टीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाला सर्वांची उपस्थिती बंधनकारक असून या प्रशिक्षणात देण्यात येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. जनगणनेतून एकही घर सुटणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी सर्व तहसीलदार, सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांच्यासह जनगणनेसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी यांची उपस्थिती होती. घर यादी, गटांची रचना याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

## समाज कल्याण विभागातर्फे विद्यार्थिनीच्या कुटुंबाला ४ लाखांचे सहाय्य मंजूर

**जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाचा तपास गतीने सुरु**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** येथील जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणामध्ये पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही गतीने केली. या प्रकरणात प्राप्त तक्रारीनंतर पोलिसांकडून पारदर्शक तपास सुरु करण्यात आला. या तपासाच्या आधारे विद्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हे दोन्ही कर्मचारी ते सध्या कोठडीत आहेत. तसेच विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे सहाय्य मंजूर करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून विद्यालयामध्ये समुपदेशक नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रकरण गांभीर्याने हाताळले जात आहे. या दुःखद घटनेत मुलीच्या कुटुंबियांना तात्काळ मदत म्हणून समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनीही जवाहर नवोदय विद्यालयाला भेट देवून विद्यार्थी, पालकांशी संवाद साधला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे निर्देश जवाहर नवोदय प्रशासनाला दिले आहेत.

## महानगरपालिका निवडणूक व्यापक बंदोबस्तासाठी पोलीस प्रशासन सज्ज



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून त्याकरिता लातूर पोलीस प्रशासनाने अत्यंत काटेकोर, शिस्तबद्ध व व्यापक बंदोबस्ताची रचना केली असून संपूर्ण यंत्रणा पूर्ण क्षमतेने सज्ज झाली आहे.

लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या निवडणुका या केवळ मतदानापुरत्या मर्यादित नसून त्या जनतेच्या विश्वासाचे, स्वातंत्र्याचे, पारदर्शकतेचे आणि न्याय्यतेचे प्रतीक असतात. प्रत्येक नागरिकाने कोणत्याही भीतीशिवाय, दबावाशिवाय शांत आणि भयमुक्त वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावावा, हीच खरी लोकशाहीची ओळख आहे.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, शांतता व सामाजिक सलोखा प्रस्थापित करणे, समाजकंटक, गुन्हेगारी प्रवृत्ती, अफवा पसरवणारे घटक व गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर नियंत्रण ठेवणे तसेच प्रत्येक मतदाराच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा या बंदोबस्ताचा मुख्य उद्देश आहे. यासाठी लातूर शहर व महानगरपालिका हद्दीत सातत्याने रूट मार्च, विशेष गस्त, नाकाबंदी, प्रतिबंधात्मक कारवाया, संशयित घटकांवर लक्ष ठेवणे व गुप्तचर यंत्रणेमार्फत माहिती संकलनाची प्रभावी यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली आहे. पूर्वी ज्या भागात तणावजन्य घटना घडल्या आहेत किंवा जिथे निवडणूक स्पर्धा अधिक तीव्र असण्याची शक्यता आहे, त्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून प्रत्येक हालचालीवर बारकाईने नजर ठेवली जात आहे.

संपूर्ण लातूर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १८ प्रभाग असून १४२ इमारतींमध्ये ३७५ मतदान केंद्रे आहेत. सर्व मतदान केंद्रांचे संवेदनशीलतेनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. सामान्य, संवेदनशील व अतिसंवेदनशील अशा वर्गवारीनुसार बंदोबस्ताची आखणी करण्यात आली असून, ज्या ठिकाणी धोका अधिक आहे त्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, डझझक्र तुकड्या, विशेष गस्त पथके व जलद प्रतिसाद पथके तैनात करण्यात आली आहेत. मतदान केंद्रांसोबतच स्ट्राँगरूम, मतमोजणी केंद्र, प्रमुख चौक, मुख्य मार्ग, बाजारपेठा व गर्दीची ठिकाणे या सर्व ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे.

महानगरपालिका निवडणूक बंदोबस्तासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. यामध्ये सहा पोलीस उपअधीक्षक, ७९ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे पोलीस अधिकारी, ७१३ पोलीस अंमलदार, ४५० होमगार्ड जवान, एसआरपीएफचे २ सेक्शन (३ अधिकारी व ६२ जवान), महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र महिला पोलीस पथक, अशा व्यापक दलाचा समावेश असून, संपूर्ण यंत्रणा २४ तास कार्यरत ठेवण्यात आली आहे.

लातूर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने लातूर शहरातील पोलीस स्टेशन गांधी चौक शिवाजीनगर एमआयडीसी व विवेकानंद या पोलीस स्टेशन करिता प्रत्येकी एक उपविभागीय पोलीस अधिकारी नियुक्त केले आहेत. ही संपूर्ण तयारी म्हणजे केवळ बंदोबस्त नसून, लोकशाही मूल्यांचे संरक्षण, नागरिकांच्या अधिकारांचा सन्मान आणि समाजात शांतता, सलोखा व विश्वास टिकवून ठेवण्याचा लातूर पोलिसांचा दृढ संकल्प आहे.

# लातुरात पोवाड्यातून मतदान जनजागृती

**प्रा. डॉ. संदीपान जगदाळेंचा लातूर शहरात लोकशाहीचा जागर । स्वीप व दयानंद कला महाविद्यालयांचा उपक्रम**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाचा टक्का वाढावा, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मतदार जनजागृती उपक्रमांना लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा उपक्रम महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसळे, स्वीप प्रमुख व मनपा शिक्षणाधिकारी श्र्वेता नागने, शालेय शिक्षण विभागाचे मधुकर ढमाले, सतीश भापकर व सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

याच उपक्रमांतर्गत दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे हे पोवाड्याच्या प्रभावी माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करीत आहेत.स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा, लोकशाही मूल्ये व संविधानाची महती यांचा सुरेख संगम असलेला हा पोवाडा दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून सादर करीत आहेत.




देशासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारक, देशभक्त व शहीद जवानांना शाही मुजरा अर्पण करत शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे आपल्या पोवाड्यातून लोकशाहीचे मोल अधोरेखित करीत आहेत. संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून पवित्र कर्तव्य आहे, हा संदेश ते शाहीरी आवेशात जनतेपर्यंत पोहचवत आहेत.

हा मतदार जनजागृती पोवाडा गंजगोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दयानंद गेट, विवेकानंद चौक, मशिद रोड, सुभाष चौक, गरुड चौक, महात्मा बसवेश्र्वर चौक, विअशाली बुद्ध विहार आदी प्रमुख ठिकाणी सादर करीत केले आहे. याचबरोबर मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रांमध्येही पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती करीत आहेत. जय जय भारत माता, संविधान देवता अशा घोषणांमधून नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम व कर्तव्यभावना जागृत करीत आहेत. या पोवाड्याला दयानंद कला महाविद्यालयातील प्रा. शरद पाडे, प्रा. सूरज साबळे, प्रा. विजय मस्के, प्रा. हरी कुंभार व अनमोल कांबळे यांची प्रभावी साथसंगत लाभत आहे.

पोवाड्यातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, लोकशाहीची वाटचाल, संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांचे महत्त्व तसेच मतदानाकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाहीवर होणारे परिणाम प्रभावीपणे मांडीत आहेत. अधिकाराबरोबर कर्तव्याची जाण आवश्यक आहे व एका मतानेही परिवर्तन शक्य आहे हा संदेश नागरिकांमध्ये ठसठशीतपणे रुजवीत आहेत.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, सचिव रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांनी शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## थोडक्यात...

### ब्लू माऊंटेन प्री-स्कूलमध्ये मकरसंक्रांती उत्साहात



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू माऊंटेन प्री-स्कूलमध्ये मकरसंक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना मकरसंक्रांती सणाचे महत्त्व, परंपरा व सामाजिक संदेश याबाबत माहिती दिली. सणानिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी रंगीबेरंगी पतंग तयार केले. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात पतंग उडवत विद्यार्थ्यांनी सणाचा आनंद लुटला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, सांस्कृतिक जाणीव तसेच सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली. शिक्षकवृंदांच्या मार्गदर्शनाखाली मकरसंक्रांती सण आनंददायी व शैक्षणिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

### फारोळा ग्रामपंचायतीत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जंयती उत्साहात



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा ग्रामपंचायत कार्यालय येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे सरपंच सलीम महमंद पठाण यांच्या हस्ते पुष्पहार घालून व पुजण करून अभिवादन करुन जयंती साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे, उपसरपंच शितल चाव्हरे, कमल गोरे, पल्लवी गोरे, सरला पोपळघट, विष्णू पोपळघट, तमिजाबी पठाण, इलियास पठाण, रेखा इंदापुरे, बन्सीराव चाव्हरे, रविंद्र गोरे, रमेश पवार दिलीप गोरे, गणेश गायकवाड, तेजस जाधव, संजय धुमाळ, रविंद्र पवार, मंगेश धुमाळ, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने व गावकरी आदींची उपस्थित होते.

### रामजीनगर येथे जिजाऊ व विवेकानंद यांची जयंती



**सोयगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचा जयंती दिनानिमित्त शाळेत मुलींनी राजमाता जिजाऊंचा पोशाख करून आले होते.तसेच त्यांनी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर माहिती सांगितली.याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे व माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू कुडके, मनीषा जेठे, वैशाली इंगळे,भास्कर श्रीखंडे, मुख्याध्यापक रघुनाथ काटोले तसेच सर्व सदस्य उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल चौधरी यांनी केले.

### जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती उत्सव साजरी

**सोयगाव :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब तसेच युगपुरुष स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने सोयगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यमुलवाड साहेब व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रवींद्र काळे, शालेय स्थापन समितीचे अध्यक्ष भागवत गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक हर्षल काळे, उपाध्यक्ष माजी विद्यार्थी संघ मंगेश सोहनी, समाजसेवक सुनील गावंडे, पत्रकार भरत पगारे, पत्रकार पुनम परदेशी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य अण्णा वाघ, रविंद्र साखळे, कृषीभुषण अरुण सोहनी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### 'लक्ष्मी निवास' मध्यमवर्गीय भावविश्व मांडणार

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवर १२ जानेवारीपासून सुरू होणारी नवी कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' मध्यमवर्गीय कुटुंबांचे वास्तव मांडणार आहे. या मालिकेत अभिनेत्री मानसी जोशी रॉय 'लक्ष्मी' ही शांत पण खंबीर स्त्री साकारत असून, ती प्रेम, संयम व त्यागातून कुटुंबाचा आधारस्तंभ ठरते. मालिकेची कथा लक्ष्मी आणि तिचे पती श्रीनिवास यांच्या आयुष्याभोवती फिरते. ३५ वर्षे भाड्याच्या घरात राहिल्यानंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करताना येणाऱ्या आर्थिक व कौटुंबिक अडचणींचे वास्तववादी चित्रण यात आहे. भूमिकेविषयी बोलताना मानसी जोशी रॉय म्हणाल्या, शक्ती नेहमी मोठ्या आवाजात दिसते असे नाही; शांतपणे उभे राहण्यातही ती असते.

### पुंडलिक मानकर यांचे निधन



**सोयगाव :** येथील पुंडलिक तुळशीराम मानकर(वय.७१) यांचे अल्पशा आजाराने दि.१३ मंगळवार मध्य रात्री १२:३० वाजता निधन झाले.त्यांचेवर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वा. त्यांच्या शेतामध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी नगरसेवक योगेश मानकर, नगरपंचायतचे कर्मचारी राजेश मानकर यांचे ते वडील होत.

### पाटिलबा मुट्ठे यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** म्हसला ता.फुलंब्री येथील रहिवासी पाटिलबा बाळा मुट्ठे (वय ९५) यांचे मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्यावर म्हसला येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रभाकर भाऊसाहेब मुठ्ठे याचे ते आजोबा होत.

# पैठण न.प. उपनगराध्यक्षपदी तुषार पाटील

**तभा वृत्तसेवा,**

**पैठण, दि १२ :** आमदार विलास बाप्पू भूमरे यांच्या हस्ते पैठण नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी तुषार सूर्यभान पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. न. प. प्रांगनात आयोजित पदग्रहण सोहळ्यावेळी ही निवड करण्यात आली. शिवसेना पक्षावर जनतेने दाखवलेल्या सार्थ विश्र्वासाबद्दल आमदार भूमरे यांनी आभार मानत पैठण शहराचे सर्वांगीण विकास करणार असल्याचे सांगितले.

नगरपरिषद येथे नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर तसेच सर्व सदस्यांचे पदग्रहण सोहळा आमदार विलास बाप्पू भूमरे, मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ पल्लवी अंभोरे, दूध संघांचे संचालक नंदलाल काळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्र्वस्त दादा बारे, तालुकाप्रमुख अण्णासाहेब लबडे, भूषण कावसनकर, भाऊसाहेब तरमळे, शहराध्यक्ष जितू परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

लोकनियुक्त नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर यांनी आपल्या मनोगतात तीर्थक्षेत्र पैठण नगरीचा विकास, मोक्षघाट सुशोभीकरण, पैठणकरांसाठी वाचनालय, स्वच्छता, पाणी, रस्ते ओपनस्पेस विकास, जेष्ठ नागरिकांसाठी सुख सुविधा बाबत प्राध्यान्याने काम करणार असल्याचे सांगितले.

नगरसेवक विलास आडसूल, नगरसेविका कविता शेखर शिंदे, नगरसेवक वीर करकोटक, नगरसेविका स्नेहल सूर्यकांत धुपे, नगरसेविका राजश्री राजू गायकवाड, नगरसेवक ईश्वर दगडे, नगरसेवक सुनील रासने, नगरसेविका संगीता ज्ञानेश्वर मापारी, नगरसेविका वैशाली ईश्वर परदेशी, नगरसेवक महेश मुंदडा, नगरसेविका अलका गोपालसिंग परदेशी, नगरसेवक बजरंग लिंबोरे, नगरसेवक गोवर्धन टाक, नगरसेविका मंगलताई सुनील हिंगे, नगरसेवक गौरव आठवले, नगरसेविका असिफाखाबेगम ील साळवे, नगरसेवक हस्णोद्दीन कट्यारे,



पठाण, नगरसेविका रुपाली संजय सोनारे, नगरसेविका अनिता रमेश वीर, नगरसेवक रफिक कादरी, नगरसेविका मनीषा स्वप्न-नगरसेविक ज्ञानेश्वर दहीवाळ, नगरसेविका पूजा शिवराज पारिक, नगरसेविका योगिता गणेश वरकड यांनी यावेळी पदग्रहण केले.

# ट्रायल घेताच फुटली नवीन पाईपलाईन

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि १३ :** पैठणकरांसाठी वरदान ठरणाऱ्या नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन जोडणीचे काम ट्रायल घेताच फेल झाल्याने विरोधकांनी या कामाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केला. या कामासाठी चार दिवसांपासून शहराचा पाणी पुरवठा बंद कारण्यात आला आहे. दुसरीकडे तांत्रिक अडचण आलेल्या याठिकाणी नगराध्यक्ष भूषण कावसनकर यांच्यासह नगरसेविक, पदाधिकारी यांनी भेट देऊन काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

पाणी भरणा मुख्य पाईपलाईनवर लोड असल्याने पैठणकरांना पाण्याची समस्या जाणवत होती. खासदार संदीपान भूमरे, आमदार विलास बाप्पू भूमरे यांच्या प्रयत्नाने जायकवाडी



धरण मुख्य पंप हाऊस ते पैठण तसेच शहरात नवीन जलवाहिनी बसवण्याचे काम सुरु असून महात्मा बसवेश्वर चौकात या मुख्य पाईपलाईन जोडणीचे काम सुरु आहे.

या कामामुळे शनिवार दिनांक १० जानेवारी

### भूषण कावसनकर यांच्यासह नगरसेविक, पदाधिकारी यांनी घटनास्थळी दिली भेट

पासून पैठण शहराचा पाणीपुरवठा बंद कारण्यात आला होता. मंगळवार दिनांक १३ जानेवारी रोजी या कामाची ट्रायल घेतली असता हे काम फेल झाल्याने शहराचा पाणी पुरवठा आणखीन काही दिवस बंद राहणार असल्याचे चित्र आहे. अशात पाण्यासाठी नागरिकांना प्रचंड त्रास होत असून नगर परिषदेने प्रत्येक वार्डात टँकरने पाणीपुरवठा करावा अशी मागणी होत आहे.

# शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिराचा समारोप




**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १३ :** युवक-युवतींमध्ये शारीरिक, मानसिक व आत्मसंरक्षणाची क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले 'शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिर' दि. ४ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीत धर्मवीर संभाजी महाराज विद्यालयाचे मैदान, एन-५, सिडको येथे यशस्वीपणे पार पडले. समारोपप्रसंगी शिबिरार्थ्यांनी प्रशिक्षणादरम्यान शिकविलेल्या विविध स्व-संरक्षण प्रात्यक्षिकांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.

हे शिबिर हिंदु जनजागृती समिती, राष्ट्र धर्म साधना प्रशिक्षण गुरुकुल व धर्मयोद्धा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने, वीरमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आले होते. यावेळी शिबिराचे प्रमुख प्रशिक्षक तथा राष्ट्र धर्म साधना प्रशिक्षण गुरुकुलचे शरद पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

समारोपप्रसंगी सौ. मोहिनी केळकर, अध्यक्ष, भारतीय महिला टूल उत्पादक संघटना आणि डॉ. सर्जेराव ठोंबरे, माजी सिनेट सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ यांनी युवक-युवतींनी आत्मसंरक्षणासह सर्वांगीण सक्षम होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

मराठवाडा संघटक कु. प्रियांका लोणे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा संदर्भ देत शिस्त, धैर्य व राष्ट्रनिष्ठा अंगीकारण्याचे आवाहन केले. आठ दिवस चाललेल्या या शिबिरात १६० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग घेतला.

# डाबरतर्फे विद्यार्थ्यांसाठी आजारांविषयी जागरूकता उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १३ :** हिवाळ्यात तापमानातील सतत बदलांमुळे खोकला, सर्दी, फ्लू व श्वसनविकारांचे प्रमाण वाढते. या पार्श्वभूमीवर, डाबर इंडिया लिमिटेडच्या प्रमुख आरोग्यसेवा ब्रँड डाबर च्यवनप्राशतर्फे शाळकरी मुलांसाठी हिवाळ्यातील आजारांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाअंतर्गत आघाडीच्या डॉक्टरांच्या सहकार्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याबाबत मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील संत तुकाराम प्राथमिक शाळा व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको एन-७ येथे २५० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी विशेष सत्र घेऊन या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या सत्रात मुलांना वैयक्तिक स्वच्छता, पौष्टिक आहार आणि हिवाळ्यात आरोग्य कसे जपावे याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी डाबर इंडिया लिमिटेडचे आरोग्यसेवा संचालक श्रीराम पद्मनाभन म्हणाले, डाबर च्यवनप्राश गेल्या १०० वर्षांहून अधिक काळ भारतीयांच्या रोगप्रतिकारक शक्तीला बळकटी देत आहे. हिवाळ्यात थंड लाटेमुळे होणाऱ्या आजारांबाबत आम्ही सजग असून, हा उपक्रम त्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

डॉ. नितीन यांनी सांगितले की, हवामान बदलाच्या काळात अचानक तापमानात होणाऱ्या चढ-उतारांमुळे सर्दी, खोकला व फ्लूसारखे आजार वाढतात. मजबूत रोगप्रतिकारक शक्ती ही या आजारांपासून बचावासाठी प्रभावी ठरते. आयुर्वेदिक घटकांवर आधारित डाबर च्यवनप्राश रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास उपयुक्त आहे. हा उपक्रम देशातील २१ शहरांमध्ये राबविण्यात येत असून, वंचित मुलांच्या आरोग्य संरक्षणावर भर देण्यात येत आहे.

# एमजीएममध्ये राज्य रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १३ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, महाराष्ट्र पोलीस व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चा उद्घाटन सोहळा एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या उद्घाटन सोहळ्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक रूपाली दरेकर, वाहतूक पोलीस उपायुक्त शर्मिष्ठा वालावलकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर व मान्यवर उपस्थित होते.

राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या निमित्ताने शासनाच्या विविध विभागांकडून गुरूवार, दिनांक १ जानेवारी २०२६ ते शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ दरम्यान 'सडक सुरक्षा-जीवन रक्षा' ही संकल्पना घेऊन रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. वाहन अपघातास परिणामकारक रित्या आळा बसावा, नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांचा प्रचार व प्रसार व्हावा, याकरिता दरवर्षी संपूर्ण देशभरात केंद्र शासन व महाराष्ट्र शासनामार्फत दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.

एमजीएम रेडियो आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी बनविण्यात आलेला जनजागृतीपर माहितीपट येथे दाखविण्यात आला. प्रास्ताविक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार कुमठाळे यांनी तर सूत्रसंचालन यशश्री मुळे यांनी केले.

# राष्ट्रीय स्पर्धेत छ. संभाजीनगर जिल्ह्याने जिंकले १७ पदके

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि १३ :** ट्रॅडिशनल बेल्ट व मास रेसलिंग राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पेडम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मापसा गोवा येथे संपन्न झाल्या* या राष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजन स्टेट ट्रॅडिशनल रेसलिंग असोसिएशन महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष सीए तांबोली, सचिव ओमरमुक्तार तांबोळी, संतोष खैरनार, संतोष भुजबळ, यांच्या देखरेखीखाली उत्तमरीत्या पार पडली.

या राष्ट्रीय बेल्ट रेसलिंग व मास रेसलिंग स्पर्धेत दमदार कामगिरी करून राष्ट्रीय स्तरावर विविध पदक प्राप्त केल्याबद्दल सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

एकूण १७ पदके संभाजीनगर जिल्ह्याने जिंकले या मध्ये ७सुवर्ण पदक, ५ रोप्य पदक, ५कांस्य पदक महाराष्ट्र संघाने जिंकली प्रथम ट्रॉफी राष्ट्रीय गोवा स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांचे खालील प्रमाणे नावे.कु. तनुश्री प्रविण घुगे (सुवर्ण व रौप्य पदक), अनुश्री प्रविण घुगे




(सुवर्ण व रौप्य पदक), ईश्वरी सतीश मुंडे (रौप्य व कांस्य पदक) अनुश्री अमोल तर्टे (सुवर्ण व रौप्य पदक), ओजस्वी शैलेश करांडे (२ सुवर्ण पदक) वीरेंद्र विलास राठोड (२ सुवर्ण पदक) यशोधन पवन घुगे (रौप्य व कांस्य पदक) राम रावसाहेब सुरासे (२ कांस्य पदक).

विद्यार्थ्यांचे पालकांनी व जिल्हा ट्रॅडिशनल रेसलिंग मास रेसलिंग संघटनेचे अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव व मुख्य प्रशिक्षक प्रविण घुगे, प्रशिक्षिका नंदा घुगे, राधा घुगे, कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर शाम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे, सौम्य कुमार, डव्होकेट अनिल काकडे संकल्प पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश मुंढे, शिवाजी जाधव, पोदार इंटरनॅशनल शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली जोशी मॅडम यांनी विजेयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# शनी शिंगणापूर येथे भाविकांची पिळवणूक करणाऱ्या एजंटांवर कारवाई

**अहिल्यानगर, दि. १३ :** शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताअन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शनिशिंगणापूर पोलीस ठाणे आणि नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. या प्रकारांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

### उपविभागीय दंडाधिकारी यांचे आदेश

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दिनांक २८ जानेवारी २०२६ पर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आपली हरकत नोंदवता येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### प्रथमच येत आहे पॉ पेट्रोल-फिनिक्स मार्केटसिटीमध्ये

**छत्रपती संभाजीनगर :** जगभरात प्रसिद्ध आणि लहान मुलांमध्ये लोकप्रिय असलेला प्री-स्कूल शो (पी ए डब्ल्यू) पॉ पेट्रोल आता प्रथमच पुण्यात येत आहे. हा खास कार्यक्रम फिनिक्स मार्केटसिटी पुणे येथील लिबर्टी स्क्वेअर येथे ९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी लिबर्टी स्क्वेअर हे ठिकाण ॲडव्हेंचर बे थीमवर सजवले जाणार आहे. मुले आणि कुटुंब येथे मजेदार आणि इंटरॅक्टिव्ह अनुभवाचा आनंद घेऊ शकतील. हा उपक्रम भारतात जिओस्टारकडून सादर केला जात आहे.

### जाहीर प्रगटन

**मे. आर. एस तपाडीया दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

पुढील तारीख-२७/२/२०२६ दि.कि.अर्ज नं. १८/ २०२६

अर्जदार १. सुलोचनाबाई भ्र. बालचंद भोजने, वय ७७ वर्ष, धंदा घरकाम, रा. विटा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. नामदेव पि. बालचंद भोजने, वय ४६ वर्ष, धंदा घरकाम, रा. विटा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. आप्पासाहेब पि. बालचंद भोजने, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. विटा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. इंदुमती भ्र. संभाजी जाधव, वय ५१ वर्ष, धंदा घरकाम, रा. सिंहगड कॉलनी, एन-६ सिडको, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. ५. सुनिता भ्र. अजिनाथ ठेंगडे, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. पळसवाडी, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद. ६. वंदना भ्र. संजय हुमे, वय ३४ वर्ष, धंदा घरकाम, रा. लासुरगांव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद.

विरुध्द गैरअर्जदार : -निरंक

प्रकरण :-अर्जदार नं. १ ते ६ हे मयत बालचंद किसनराव भोजने यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ६ याचे वडील हे मयत बालचंद किसनराव भोजने हे होते व ते मौ. विटा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पशा आजाराने दि. १२/९/२०२५ मध्ये मौ. विटा, ता. कन्नड येथे मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ६ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच मयत बालचंद किसनराव भोजने हे शेती व्यवसाय करत होते. मयत बालचंद किसनराव भोजने यांचे अर्जदार नं. १

ते ६ हे कायदेकशीर वारस असल्यामुळे सदर वारसांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व

अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ६ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ६ हे एकाच

कुंटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ६ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ६ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर ३९;प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार नं. १ ते ६ हे मयत बालचंद किसनराव भोजने यांचे कायदेकशीर वारस आहे यांचे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. आज दि. १३/१//२०२६ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

**कनिष्ठ लिपीकख आदेशावरुन, सहायक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, क ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा.श्रीमती पि.आर.पालवे सह-१२ वे दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)) औरंगाबाद यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ८८/२०२६

१) सादिक कुरेशी सिददीक कुरेशी, वय ४२ वर्षे, धंदा शेतमजुरी, रा. रनमस्तपुरा, छत्रपती संभाजीनगर. २) रजिया बेगम सिददीक शेख, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. संगतरंग मंदीर, छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. स्वप्निल र. सुरळकर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सिददीक फारुक शेख यांचा दिनांक १८/११/२०२५ रोजी गव्हमेंट मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चयात वरील अर्जदार क्रं. १ व २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व २ हे मयत सिददीक फारुख शेख यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय करीता वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दिनांक १२/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२५/०२/२०२६

**विधीभीय लिपीक**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालय क.स्तर औरंगाबाद)**
**प्रतिलीपी :-**
**१)नोटीसबोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद.**
**२)मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.**

## अग्रलेख...

# आले किती, गेले किती...

आपल्या कर्तबगारीच्या रेषेची लांबी अधिक राखण्यासाठी इतरांच्या कर्तबगारीची रेघ पुसायची नसते, तर आपल्या रेषेची लांबी पुसली जाणार नाही याची काळजी घेत तिची लांबी अधिक वाढवायची असते, असा सल्ला देणारी एक म्हण मराठीत प्रचलित आहे. पण मराठी माणसाच्या मानसिकतेची जी काही मोजकी वैशिष्ट्ये सांगितली जातात, त्यासोबत ही म्हण काहीशी विसंगतदेखील असल्याचे मानले जाते. आज जग जवळ येत आहे, देशोदेशीच्या भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाऊन माणसामाणसांतील जवळीक वाढत आहे, माणसांतील सहकार्याची भावना वाढीस लागून एकमेकांस साहाय्य करून अवघ्यांची प्रगती साधावी हा विचार स्वीकारला जात आहे. एका बाजूला, वसुधैव कुटुम्बकम या भारतीय संस्कृतीचा प्रसार जगभर सुरू आहे, तो विचार स्वीकारला जात असून, ज्यांच्याकडे देण्यासारखे भरपूर काही आहे ते त्यांनी अभावग्रस्तांस द्यावे आणि आपल्या प्रगतीसोबत त्यांच्याही प्रगतीस हातभार लावावा अशी भावना बळावत आहे, तर दुसरीकडे माणसामाणसांतील भेदभावही वाढत असून वेगवेगळ्या कारणांमुळे मानसिक अंतरही दुणावत चालले आहे. अनेक कारणांमुळे सामाजिक जवळीक पुसली जात आहे आणि कुटुंबव्यवस्थेची अवस्थाही चिंताजनक होत चालली आहे. अशा परिस्थितीत, आपल्या रेघेची लांबी मोठी राहावी यासाठी फारसे प्रयत्न करण्याऐवजी इतरांच्या रेषा पुसणेच सोपे असल्याचे ओळखून तसे प्रयत्नही होताना दिसत आहेत. मराठी माणसांच्या मानसिकतेबाबत तर तसेच बोलले जात असल्याने, त्या मानसिकतेसाठी ही म्हण अतिशय चपखल असल्याचे बोलले जाते. एवढेच नव्हे, तर असे करणे हीच मराठी मानसिकता, असा कुचेष्टेचा सूरही याबाबत लावला जातो. आपली प्रगती होत नसेल तर दुसऱ्याचे पाय खेचावेत आणि त्याच्या प्रगतीचा मार्ग रोखावा ही मराठी मनाची बुरसट मानसिकता असल्याच्या टीकेची टोचणी मराठी संस्कृतीस केव्हापासून लागून राहिलेली असल्याने, बदलत्या जगात आणि वैश्विक मानसिकतेच्या कक्षा विशाल होत असताना अशी संकुचित मानसिकता पुसली पाहिजे या जाणिवा रुजविण्याची आता खरी गरज आहे. मराठी माणसाची प्रवृत्ती खेकड्यासारखी असते, अशा कुत्सित उपमादेखील कधी कोणाकडून दिल्या जातात, तेव्हा मराठीपणाच्या वास्तवाकडे तटस्थतेने पाहून भल्याबुऱ्याचा हिशेब मांडण्याचा व गरजेनुसार बदल अथवा दुरुस्त करण्याचा शहाणपणा अंगी आला पाहिजे असा सध्याचा काळ आहे. मराठी मानसिकतेस संकुचितपणाचे लेबल चिकटविले जात असेल, त्या मानसिकतेस खेकड्याच्या स्वभावाची उपमा दिली जात असेल किंवा इतरांच्या कर्तृत्वाच्या रेषा पुसून आपल्या रेषेची लांबी वाढविण्याचा त्याचा स्वभाव असल्याचे सांगितले जात असेल, तर ते बदलणे आणि प्रगतीच्या व उत्कर्षाच्या वाटेवर चालताना इतरांचे बोट धरण्याची गरज मराठी मानसिकतेने ओळखली पाहिजे. कारण, बदलत्या जगाची ती गरज आहे आणि त्यासोबत चालण्यातच खरे हित आहे. हा बदल स्वीकारणे आणि अंगीकारणे सोपे नाही, कारण, या मानसिकतेचा पगडा जुनाच असल्याने एकदम तो काढून फेकून देणे काहीसे अवघडही होऊ शकते. त्यामुळेच, त्यासाठी प्रखर निर्धार हवा आणि त्या मानसिकतेच्या खाणाखुणादेखील जवळपास फिरकणार नाहीत याची जाणीवपूर्वक काळजीदेखील घ्यावयास हवी.

मुळात, संकुचित मानसिकता निर्माण होण्याची कारणे शोधताना, मराठी माणसाच्या स्वाभाविक वाटचालीचा मागोवा घेणे योग्य ठरेल. मराठी माणूस मुळात कर्तबगार आहे, पराक्रमी आहे आणि मराठीपणाच्या कर्तबगारीने इतिहासाची असंख्य पाने सोनेरी होऊन सजलेली आहेत. त्यामुळे मराठी माणसाच्या कर्तबगारीच्या रेषा अगोदरच एवढ्या लांब आहेत, की ती लांबी गाठण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्तबगारीच्या असंख्य पायऱ्या पार करतानाही एखाद्याची दमछाक होऊ शकते. असे असतानाही, आपल्या कर्तबगारीवर विश्वास ठेवण्याऐवजी किंवा कर्तबगारीच्या इतिहासात भर घालण्याऐवजी आपल्या कर्तबगारीच्या रेषा पुसण्याचे प्रयत्न सुरू असल्याच्या अवास्तव भयाखाली सतत वावरत राहणे हेच गैर असतानाही, आसपास सातत्याने याच भीतीच्या घंटा बडविल्या जात असून, आपल्या अस्तित्वावर संकट असल्याचे भय दाखवून त्याचे काही लाभ उपटण्याची कारस्थाने हेच या भीतीचे कारण ठरणार असे दिसू लागले आहे. अशी भीती दाखविण्याची जी काही कारणे आहेत, त्यामध्ये राजकारण हे महत्त्वाचे कारण आहे, हे आता लपून राहिलेले नाही. अस्तित्व पुसण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा बागुलबुवा माणसासमोर उभा केला की त्या भयाच्या सावटाखाली असुरक्षितपणाची भावना बळावते, ते वास्तव आहे किंवा नाही याची खात्री करण्याच्याही फंदात फारसे कोणी पडत नाही आणि भयग्रस्तांच्या कंपूत सहभागी होऊन मुळातच नसलेल्या भीतीपासून स्वतःचे संरक्षण करण्याकरिता धडपड सुरू होते. अलिकडच्या काहींच्या संकुचित राजकारणाने नेमके हेच ओळखले असून अस्तित्व पुसण्याच्या कटाचा बागुलबुवा दाखवून मराठी मनावर कब्जा मिळविण्याचे नेमके हत्यार त्या हातात आले आहे. मुंबईवरील मराठी ठसा पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा करून अगोदरच अस्तित्वाच्या भयखुणा उमटलेल्या मनामनात आणखी असुरक्षितता पेरण्याचा हा प्रयत्न दीर्घकालानंतर मराठी मने कमकुवत करून सोडणारा आणि हतबलतेच्या भावनांना खतपाणी घालणारा ठरू शकतो, याची पर्वादेखील अशा राजकारणात केली जात नसेल, तर मराठी मानसिकतेच्या पराक्रमी इतिहासाची परंपरा पुढे चालविण्याची उमेदही संपून जाण्याची भीती अधिक आहे.

मुंबईतील मराठी माणूस हद्दपार करण्याचा, मुंबईचे मराठीपण पुसण्याचा आणि मुंबईतील मराठी माणसाचा हक्क हिरावून घेण्याचा कट सुरू असल्याचा कांगावा करून राजकारण करण्याचा हा प्रयत्न म्हणजे, हतबलतेच्या भावना रुजविण्याचा व त्याचे तात्कालिक लाभ उठविण्याचा एक प्रयत्न ठरू शकतो. ते टाळण्याची गरज असताना उलट आता त्यापुढचे पाऊल टाकले जात असल्याचे दिसू लागले असून केवळ भावनिक राजकारण करून मराठी मने कमकुवत करण्याचा व त्याचा लाभ उठविण्याचा प्रयत्न सुरू झाल्याची शंका यावी असा खेळ सुरू झाला आहे. मराठीपण पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा करून भय पेरण्याच्या राजकारणाचा प्रभाव पुरेसा ठरत नसल्याची जाणीव कदाचित या कांगाव्याच्या लाभार्थींना आता झाली असावी. त्यामुळेच त्यापुढे जाऊन आता नावे पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा सुरू झाला आहे. मुळात, वर्तमानावर उमटलेल्या नावामागेही इतिहासाचीच पुण्याई आहे हे न ओळखता किंवा आजच्या काळावर आपली नावे उमटली यामध्ये आपले कर्तृत्व नेमके काय याचा विचारही न करता हा नवा कांगावा सुरू करणे म्हणजे नावामागे असलेल्या कर्तबगारीच्या रेषेची लांबी वाढविण्यात येणाऱ्या अपयशाची कबुली ठरते. इतिहासावर आपली नावे उमटविणाऱ्यांच्या पुण्याईवरच आपल्या कर्तृत्वाच्या रेषांची लांबी वाढली आहे याची जाणीवही न ठेवता, नावे पुसण्याच्या भयाचा बागुलबुवा उभा करून भावनिक भयाचे नवे हत्यार आता उपसले जाऊ लागले आहे. आपल्या नावापुढे जन्मदात्याचे नाव नसते, तर आपण शून्य आहोत याची जाणीव बोलून दाखविणाऱ्यांना अगोदरच आपल्या कर्तृत्वाच्या रेषेची लांबी नेमकी किती आहे हे माहीत आहे. ती लांबी वाढविण्यासाठी आपण कोणते कर्तृत्व दाखविले, याचा हिशेबदेखील मांडता येत नसेल, तर अगोदरच्या पिढ्यांच्या कर्तृत्वाची रेषा जपण्याची तरी उमेद जिवंत ठेवावयास हवी. केवळ इतिहासाची जपणूक केली नाही म्हणून भूतकाळातील अनेक कर्तबगार नावेदेखील इतिहासातून पुसली गेली, हादेखील एक इतिहासच आहे. एखाद्या नावाची प्रतिष्ठा वाढविण्याएवढी कर्तबगारी दाखवून इतिहासताने लिहिलेल्या नावावर सोनेरी मुलामा चढविण्याची कर्तबगारी गाजवायची, की नावे पुसली जाणार या भीतीचा बागुलबुवा समोर उभा राहिल्याचे भासवत हातपाय गाळून इतरांकडे आधाराची अपेक्षा करायची, हे ज्याचे त्याने ठरवायला हवे. अन्यथा, कोणत्याही मानसिकतेला लागलेल्या गैरसमजाची कीड पुसणे अवघडच होत जाईल. ▮

## आंतरराष्ट्रीय

# इराणमधील जनता रस्त्यावर का?

प्रा. जयसिंग यादव

श्रीलंका, नेपाळ, बांगलादेशनंतर अलिकडे इराणमध्येही लोक रस्त्यावर उतरले. नेपाळ किंवा फ्रान्सप्रमाणे जेन झी रस्त्यावर उतरून आपल्याच सरकारला आव्हान द्यायला लागली आहे. राजधानीच्या मुख्य ग्रॅण्ड बाजाराभोवतीही निदर्शने झालीत. निदर्शकांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. व्यापारी आणि दुकानदारांनी तेहरानच्या मध्यभागी सादी स्ट्रीटवर आणि राजधानीच्या मुख्य ग्रॅण्ड बाजाराजवळील शुश परिसरात मोर्चा काढला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणच्या चलनाच्या आतापर्यंतच्या नीचांकी घसरणीनंतर आणि देशाच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख मोहम्मद रेझा फरझान यांनी राजीनामा दिल्याच्या वृत्तानंतर ही निदर्शने झालीत. निदर्शकांना शांत करण्याचा प्रयत्न करताना, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी हा लोकांच्या जीवनमानाचा हा रोजचा प्रश्न आहे आणि निदर्शकांच्या मागण्यांना वैध म्हटले आहे. त्यांनी इराणच्या गृहमंत्र्यांना निदर्शकांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्या ऐकण्याचे निर्देश दिले आहेत; जेणेकरून सरकार समस्या सोडवण्यासाठी आणि जबाबदारीने प्रतिसाद देण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू शकेल. पाश्चात्त्य निर्बंधांमुळे इराणी अर्थव्यवस्थेला बसलेल्या धक्क्यामुळे निदर्शने सुरू झालीत. खुल्या बाजारातील दरांवर लक्ष ठेवणाऱ्या वेबसाईटनुसार, देशाचे चलन, रियाल अमेरिकन डॉलरच्या तुलनेत सुमारे १३ लाख नव्वद हजाराच्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले. त्यामुळे व्यापक संताप निर्माण झाला. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, सुमारे नव्वद दशलक्ष लोकसंख्येच्या इराणमध्ये रियालच्या घसरत्या मूल्यामुळे अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडल्या.

इराणच्या भयानक आर्थिक परिस्थितीत लोक रस्त्यावर उतरले असताना, निदर्शक आणि सुरक्षा दलांमधील संघर्षांचे फुटेज ऑनलाईन समोर आले. इराण तीव्र महागाई आणि राष्ट्रीय चलनाच्या घसरणीशी झुंजत असताना ही निदर्शने समोर आली आहेत. अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांनी लादलेल्या निर्बंधांचा बराच काळ परिणाम होत आहे; परंतु आता परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. 'स्टेट स्टॅटिस्टिकल सेंटर'च्या मते डिसेंबरमध्ये महागाई ४२.२ टक्क्यांवर पोहोचली. ती नोव्हेंबरपेक्षा १.८ टक्क्यांनी जास्त आहे. अन्नधान्याच्या किमती ७२ टक्क्यांनी वाढल्या आणि आरोग्य आणि वैद्यकीय पुरवठ्याच्या किमती गेल्या वर्षीच्या डिसेंबरच्या तुलनेत पन्नास टक्क्यांनी वाढल्या. गेल्या आठवड्याच्या शेवटी इराणचे चलन अमेरिकन डॉलरच्या तुलनेत विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले, तेव्हा त्याच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या. 'इर्ना' या इराणच्या मुख्य सरकारी वृत्तसंस्थेनुसार, रियालच्या तीव्र अवमूल्यनामुळे व्यवसायाला धोका निर्माण झाल्यामुळे मोबाईल फोन विक्रेते संतप्त झाले होते.



इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये लिहिले की, लोकांचे जीवनमान ही माझी दैनंदिन चिंता आहे. सरकारने चलनविषयक आणि बँकिंग प्रणालींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि लोकांची क्रयशक्ती राखण्यासाठी पावले उचलली आहेत. महागाई सुमारे पन्नास टक्के असताना वीस टक्के पगारवाढ प्रस्तावित करणाऱ्या त्यांच्या सरकारच्या वादग्रस्त अर्थसंकल्पीय विधेयकाचे समर्थन करताना इराणच्या राष्ट्रपतींनी महागाई आणि महागाई वाढीशी लढण्याचे वचन दिले. तथापि, ही महागाई आणि घसरत्या चलनावर नियंत्रण मिळवण्याची शक्यता कमीच दिसते. इराणच्या आर्थिक संकटाविरुद्ध आणि चलन घसरणीविरोधात चौथ्या दिवशीही निदर्शने सुरूच राहिली. दक्षिण फार्स प्रांतातील फासा शहरातील स्थानिक सरकारी इमारतीवर निदर्शकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली. इराणी सरकारी माध्यमांच्या मते निदर्शकांच्या एका गटाने फासा गव्हनरिट कार्यालयाचे गेट तोडण्याचा प्रयत्न केला. चार दिवसांच्या निदर्शनांमध्ये जमाव पहिल्यांदाच हिंसक झाला आहे. या वेळी सुरक्षा दलांनी हस्तक्षेप करून हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला. गटाचे नेतृत्व करणाऱ्या २८ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली. सध्याची परिस्थिती निषेधापासून बंडाकडे वाटचाल करत असल्याचे दिसून येते. सरकार कधी चर्चेची ऑफर देत आहे तर कधी इशारे देत आहे; परंतु समस्येवर कोणताही उपाय निघत नाही. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणी रियाल विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचल्यामुळे महागाई आणि राहणीमान बिघडल्यानंतर ही निदर्शने इतर अनेक शहरांमध्ये पसरली. इस्फहान, याझद आणि झांजनसारख्या शहरांमधील विद्यापीठे आणि संस्थांमध्येही निदर्शने झाल्याचे वृत्त आहे. शांततापूर्ण निदर्शने कायदेशीर आहेत; परंतु हिंसाचार किंवा अराजकता सहन केली जाणार नाही, असे सरकार सांगत आहे.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या सत्तेला खरोखर धोका आहे का किंवा ही तात्पुरती अशांतता आहे का असे प्रश्न यावेळी उपस्थित केले जात आहेत. इराणमध्ये अस्तित्वात असलेली व्यवस्था आणि सरकारच्या कार्यपद्धतीवरून असे सूचित होत नाही की खामेनी यांचा लवकरच पाडाव होणार आहे. इराणमधील सत्ता केवळ सरकारच्या हातात नाही, तर त्यावर 'रिव्होल्यूशनरी गार्ड' (आयआरजीसी), सुरक्षा संस्था आणि धार्मिक संस्थांचेही नियंत्रण आहे. इतिहास दाखवतो की इराणी राजवटीने यापूर्वी मोठी निदर्शने बळजबरीने दडपली आहेत. इराणच्या अणुकार्यक्रमावरून अमेरिका-इराण संबंध अनेकदा ताणले गेले आहेत. अमेरिका इराणला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आरोप वारंवार केले जातात. सत्य हे आहे की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. तेल निर्यातीवरील बंदी आणि बँकिंग व्यवस्थेच्या ऱ्हासामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. सध्याच्या निदर्शनांमागे अमेरिकेचा थेट हात असल्याचा कोणताही ठोस पुरावा नसला, तरी इराणमधील निदर्शनांशी अनेकदा अमेरिकेचा संबंध जोडला जातो. कारण डोनाल्ड ट्रम्प सध्या त्या देशाचे अध्यक्ष आहेत. ट्रम्प आणि जॉन बोल्टनसारख्या अमेरिकन नेत्यांनी इराणमध्ये सत्ताबदलाची सातत्याने वकिली केली. अर्थात ट्रम्प यांनी कधीही स्पष्टपणे सत्ता बदलण्याचा हेतू जाहीर केला नाही. त्यांच्या मागील कार्यकाळात (२०१८) ट्रम्प यांनी ट्विटरवर लिहिले होते की इराणी नेत्यांना इतिहासात कधीही न पाहिलेले परिणाम भोगावे लागतील.

२०२० मध्ये कासिम सुलेमानीच्या हत्येनंतर ट्रम्प यांनी असेही लिहिले की, इराणी राजवटीला युद्ध हवे असेल, तर इराणचा अंत होईल. तथापि, ट्रम्प यांनी नंतर स्पष्ट केले की, ते राजवट बदलाबद्दल बोलत नव्हते. त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, अमेरिकेला राजवट बदल नको आहे; परंतु सध्याच्या निदर्शनांना मिळत असलेल्या पाठिंब्यावरून अमेरिका एका अर्थाने इराणमध्ये उठाव भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. विद्यापीठातील विद्यार्थीदेखील निदर्शनांमध्ये सामील झाले आहेत. त्यांनी 'हुकूमशहा मरण पावला'सारख्या सरकारविरोधी घोषणा दिल्या. या घोषणा खामेनी यांच्याशीदेखील जोडल्या जात आहेत, कारण ते देशाचे सर्वोच्च नेते आहेत. काही निदर्शक १९७९ च्या इस्लामिक क्रांतीमध्ये पदच्युत झालेल्या दिवंगत शाह मोहम्मद रेझा पहलवी यांच्या मुलाच्या समर्थनार्थ घोषणा देतानाही ऐकले गेले. त्यात 'शाह चिरंजीव होवो'सारख्या घोषणांचाही समावेश आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेत निर्वासित जीवन जगणारे रेझा पहलवी यांनी इन्स्टाग्रामवर लिहिले की, मी तुमच्यासोबत आहे. आपण जिंकू, कारण आपले ध्येय बरोबर आहे आणि आम्ही एक आहोत. ते पुढे म्हणाले की, ही राजवट सत्तेत राहील, तोपर्यंत देशाची आर्थिक परिस्थिती बिघडतच राहील. यावरून इराणमधील संघर्ष कोणत्या थराला गेला आहे आणि तिथल्या सत्ताधीशांविरोधात नाराजी किती वाढली आहे, हे लक्षात येते. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

# 'नेते जमीन'पर...

एरव्ही सेलिब्रेटीप्रमाणे वागणारे, सामान्यांना प्रत्यक्ष भेटणे तर दूरच पण कधी तरी कार्यक्रमांद्वारे दिसणारे अन् ज्यांचे दर्शन केवळ टेलिव्हिजनवरुनच होणारे विविध राजकीय पक्षांचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनिमित्त मात्र रस्त्यावर उतरुन प्रचार करताना दिसत आहेत. चारचाकी वाहनातून, दुचाकी वाहनावरुन रोड शो आणि पदयात्रेत सहभागी होणारे बडे राजकीय नेते मत मागणीसाठी का होईना; पण हात जोडून सामान्यांसमोर येत असल्याने लोक देखील म्हणत आहेत की, लोकशाहीत घटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकारामुळे का होईना. पण बडे नेते, उमेदवार, कायकर्ते केवळ दिसत नाहीत तर हात जोडून समोर उभारतात, घरापर्यंत येवून दंडवत घालत आहेत. हेच मतदार असे देखील म्हणत आहेत की, पाच वर्षांतून किमान आठ ते दहा दिवस तरी राजकीय नेते जमिनीवर असतात. अन्यथा उर्वरित पाच वर्षे आपल्याला ओळखतो तरी कोण?

राज्याचे विधानसभेचे सभापती, उपसभापती, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, चाळीस मंत्री, ४८ खासदार, २८८ आमदारांसह ९० च्या आसपास विधानपरिषदेचे आमदार या बड्या राजकीय हस्ती महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मैदानात उतरल्या आहेत. आपल्या पक्षाची सत्ता यावी यासाठी या नेत्यांची तळमळ, धडपड पाहून लोकदेखील तोंडात बोट घालत आहेत. प्रचाराच्या भाषणातून विविध प्रकारची गाजरे दाखवणारे हे नेते निवडणुका संपल्यानंतर कधी तरी सामान्य जनतेला विश्वासात घेताना दिसतात का? लोकांच्या हितासाठी मोठे निर्णय घेणारे राज्यकर्ते असोत की लोकांसाठीच आम्ही सरकारच्या विरोधात उभारतो, असे सांगणारे विरोधक असोत कधी तरी निर्णय घेताना लोकांच्या मतांचा विचार करतात का? लोक म्हणत आहेत की, मतदान करताना आम्ही आपल्या विचारांच्या राजकीय पक्षांना करतो पण सत्तेसाठी अनेक राजकीय पक्ष आपले विचार कमरेला गुंडाळून कधीही कोणत्याही पक्षाशी हातमिळवणी करीत आहेत. मग आमच्या मतांचा अनादर होतो आणि तो अधिकार यांना कोणी दिला? स्वार्थ आणि सत्तेसाठी तसेच आपली भ्रष्टाचाराची पापे लपविण्यासाठी अनेक पक्षाचे राजकीय नेते विचारधारेला मूठमाती देत पक्षांतर करतात हे राजकारण पुरोगामी महाराष्ट्राला अशोभनीय असल्याचेही लोक बोलत आहेत. केवळ सत्तेसाठी कधी युती-आघाड्या करायच्या तर निवडणुका आल्या की स्वार्थासाठी आणि मतांच्या राजकारणासाठी कोण, कोणत्याही पक्षाबरोबर जाताना दिसतो आहे. नेतेच स्वैर वागत असल्यामुळे आता कार्यकर्तेदेखील सोयीने पक्ष बदलताना दिसतो आहे. राजकारणी स्वार्थ आणि सत्तेसाठी अनितीने वागणार आणि पुन्हा वरुन म्हणणार जैसी प्रजा वैसा राजा... मतांच्या मागणीसाठी घरोघरी फिरणारे आणि रस्त्यावर उतरुन हात जोडणारे नेते एरव्ही मात्र मतदारांना कोलताना दिसतात. ज्या लोकांच्या मतांवर मंत्री मंत्रालयात पोहचतात त्याच लोकांना मंत्रालयात जाण्यासाठी रांगेत उभारायला लावतात. मंत्रालयात सामान्यांना प्रवेश हवा असेल तर त्याला दुपारी दोननंतरची वेळ दिली जाते. ज्यांच्या मतांवर मंत्री मंत्रालयावर राज्य करतात त्यांना राजेशाही वागणूक दिली जाते, ज्यांच्या कररुपी पैशावर चाकरमानी मंत्रालयाचे मालक बनले त्यांचा दरारा मोठा असतो. पण लोकशाहीत ज्यांच्यामुळे मंत्री व प्रशासकीय अधिकारी हा राजेशाही थाट उपभोगतात ते लोक मात्र मंत्रालयात प्रवेशासाठी रस्त्यावर रांगेत उभारुन मंत्रालयात सोडण्याची याचना करताना दिसतात; ही शोकांतिका लोकशाहीत लोकांच्या वाट्याला आलेली आहे. मंत्री आपली कामे अधिकाऱ्यांना धारेवर धरुन करुन घेतात, आप्तेष्ट आणि जवळच्या कार्यकर्त्यांची शासकीय कामे करण्यास मंत्री भाग पाडतात. पण ज्या लोकांच्या मतांवर सत्ता भोगतात त्यांची कामे मात्र होत नसल्याचे वेदनादायी चित्र आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईतील बहुतांश आमदार निवास बंद असल्याने आमदारांना राहण्यासाठी लाखो रुपयांचे भत्ते दिले जातात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कामासाठी मुंबईत येणाऱ्या नागरिक, कार्यकर्त्यांना राहण्यासाठी खिशाला कात्री लावून हॉटेलमध्ये राहण्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून दिलेल्या मताच्या अधिकारामुळे किमान निवडणुका आल्यानंतर तरी सामान्य जनतेला मतदानासाठी महत्व असते. दादा, मामा, ताई, माई, अक्का संबोधून नेते मतांसाठी पाय धरताना दिसतात. पण इतरवेळी पाच वर्षे मात्र मतदारांना कोणीही विचारत नाहीत. निवडणुका आणि मतांसाठी तरी का होईना पण नेते जमिनीवर आल्याचे पाहून लोक मनातल्या मनात तरी खूष होत आहेत, हे मात्र नक्की होय.




# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी!

## प्रासंगिक

- अलका पाटील
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले. १७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.



गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे. श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे. या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

## वाचक पत्रे

### भोगी : निसर्गाच्या सात्त्विक अन्नाचा आणि आनंदाचा सण

मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी साजरा केला जाणारा भोगी हा सण आनंद, उत्साह आणि निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. मकरसंक्रांतीच्या उत्सवातील आदला दिवस म्हणजे भोगी. साधारणपणे दरवर्षी १३ किंवा १४ जानेवारीला हा सण येतो. भोगी या शब्दाचा अर्थ आहे उपभोग घेणे किंवा आनंद साजरा करणे. विशेषतः शेतकरी वर्गासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा असतो, कारण या काळात शेतात नवीन धान्य आणि भाज्यांचे पीक आलेले असते. पौराणिक कथेनुसार, या दिवशी देवराज इंद्राने नहुष राजाचा गर्व हरण केला होता. म्हणून इंद्राची पूजा करून हा दिवस साजरा केला जातो. थंडीच्या दिवसात शरीराला उष्णता आणि ऊर्जा देणारे पदार्थ खाण्याला या दिवशी विशेष महत्त्व आहे.

या दिवशी पहाटे उठून घर स्वच्छ केले जाते. घरासमोर सुंदर रांगोळी काढली जाते. घरातील सर्व सदस्य अंगाला तिळ लावून कोमट पाण्याने स्नान (अभ्यंगस्नान) करतात. नवीन कपडे परिधान करून आनंद साजरा केला जातो. या दिवशी घरामध्ये देवदेवतांची पूजा केली जाते. शेतात आलेल्या नवीन पिकांचा नैवेद्य देवाला दाखवला जातो. भोगीच्या दिवशी मुख्य आकर्षण म्हणजे भोगीची भाजी. हिवाळ्यात मिळणाऱ्या सर्व ताज्या भाज्या एकत्र करून ही भाजी बनवली जाते. यात प्रामुख्याने घेवडा, वालपापडी, हरभरा, गाजर, वांगी, बटाटा, ओले वाटाणे, बोरं आणि शेंगदाणे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भरपूर तिळ या घटकांचा समावेश असतो.

भोगीच्या दिवशी बाजरीची भाकरी आणि लोणी खाण्याची पद्धत आहे. बाजरी उष्ण असते आणि तिळामुळे शरीराला स्निग्धता मिळते, जी हिवाळ्याच्या ऋतूत आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. सोबतीला मुगाची डाळ घातलेली खिचडी आणि कढी देखील केली जाते. महाराष्ट्रात भोगीच्या दिवशी एकमेकांना शुभेच्छा देताना ''भोगीच्या शुभेच्छा, नांदा सुखकर!''असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, तुमच्या आयुष्यात सुख-समृद्धी नांदो आणि तुम्हाला सर्व प्रकारचे भोग (सुख) प्राप्त होवोत.

थोडक्यात सांगायचे तर, भोगी हा सण आपल्याला निसर्गाशी जोडतो. नवीन पिकांचा आस्वाद घेणे, आरोग्य जपणे आणि कुटुंबासोबत आनंदाने भोजन करणे हाच या सणामागचा मुख्य उद्देश आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

### मकरसंक्रांत : सूर्यदेवताप्रति कृतज्ञता!

सूर्य जेव्हा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, त्याला 'सूर्यसंक्रांत' असे म्हणतात. सूर्याचा हा राशिबदल साधारणपणे दर महिन्याला एकदा होत असतो. त्यामुळे वर्षभरात एकूण बारा सूर्यसंक्रांती येतात. कर्कसंक्रांतीनंतर सूर्य दक्षिणेकडे जातो या कालखंडाला 'दक्षिणायन' असे म्हणतात. मकरसंक्रांतीनंतर सूर्य उत्तरेकडे गमन करतो. या गतीला 'उत्तरायण' असे म्हणतात. मकरसंक्रांतीला विशेष महत्त्व दिले गेले आहे. कारण, पृथ्वी सूर्याच्या जवळ गेली अथवा सूर्यापासून दूर गेली, तरी सूर्याच्या तेजावर अथवा सामर्थ्यावर कोणताही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील चढउतार, सुख-दुःख याकडेही साक्षीभावाने पाहावे, असा महत्त्वाचा संदेश मकरसंक्रांत आपल्याला देते. मकरसंक्रांतीचे आणखी एक महत्त्व म्हणजे कृतज्ञतेची भावना! सूर्यदेवाने तहानलेल्या अश्वांना ज्या मातीच्या घडांनी पाणी पाजले त्या घड्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण असे देखील मकरसंक्रांतीचे महत्त्व आहे. या संदर्भातील आख्यायिका अशी सांगितली जाते की, पृथ्वीवरील बर्फ वितळविण्यासाठी सूर्यदेवाने अधिकाधिक उष्णता देत कठोर तपश्चर्या केली. त्यावेळी सूर्यरथाला जुंपलेल्या अश्वांना ती उष्णता सहन न झाल्याने त्यांना तीव्र तहान लागली. तेव्हा सूर्यदेवाने मातीच्या घड्यांच्या माध्यमातून पृथ्वीवरील पाणी खेचले. जसे विहिरीतून घड्याने पाणी काढले जाते, त्याचप्रमाणे त्या अश्वांना पाणी पाजण्यात आले. या मातीच्या घड्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संक्रांतीच्या काळात त्यांची पूजा करण्याची प्रथा सुरू झाली. आजही मकरसंक्रांतीच्या काळात हळदी-कुंकवाच्या निमित्ताने पूजन केलेले मातीचे घडे (सुगडे) एकमेकींना वाण म्हणून देण्याची परंपरा आपल्याकडे आहे. सूर्यदेवतेप्रति कृतज्ञ राहून, जीवनातील चढउतारांमध्ये स्थिर आणि सकारात्मक राहण्याचा संकल्प करून मकरसंक्रांत अर्थपूर्ण रीतीने साजरी करूया. ▮



**रेणुका हरदास**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सेलू तालुक्यात अवैध वाळू उपशावर महसूल विभागाची धडक कारवाई

**सेलू,/प्रतिनिधी :** तालुक्यात महसूल विभागाच्या वतीने अवैध वाळू




उपसा करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम सुरू असून, या मोहिमेंतर्गत मंगळवार (दि. १३) रोजी काजळी रोहिणा येथील दूधना नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणारे एक ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले.

तालुक्यात मागील काही दिवसांपासून महसूल विभागाकडून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाहनांविरोधात सातत्याने धरपकड व कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, काजळी रोहिणा परिसरात दूधना नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याची माहिती महसूल पथकास मिळाल्यानंतर सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत काजळी रोहिणा येथील विष्णू श्रीरंग काष्टे यांच्या मालकीचे ट्रॅक्टर (क्र. एम.एच. २८ बी.के. ८७६९) अवैध गौण खनिज वाहतूक प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असून संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेले ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहे. ही कारवाई उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी दीपक गांगुर्डे यांच्या पथकाने केली. महसूल विभागाच्या या धडक मोहिमेमुळे तालुक्यातील वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

### कै. राजाभाऊ कदम स्मृतीप्रित्यर्थ १७ जानेवारी रोजी सोनपेठात वक्तृत्व स्पर्धा

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष कै. राजाभाऊ कदम यांच्या स्मृतीप्रित्यर्थ येत्या १७ जानेवारी रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा यंदा आठव्या वर्षात पदार्पण करीत आहे.

या वर्षी स्पर्धेचा विषय 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि विद्यार्थ्यांचे बदलते शिक्षणविश्व' असा असून स्पर्धा मराठी भाषेत होणार आहे. राज्यभरातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील (२५ वर्षांखालील) विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग घेऊ शकणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास ४ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिके (प्रत्येकी १,००१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र) देण्यात येणार आहेत.

स्पर्धेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष परमेश्वर कदम, तर उद्घाटक म्हणून गणेश गटकळ (संस्थापक, अभिनव विद्यालय, संगम) हे उपस्थित राहणार आहेत. राज्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी पाठवून सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील, प्रा. संतोष रणखांब, प्रा. डॉ. सखाराम कदम, प्रा. डॉ. बी. व्ही. आंधळे तसेच ग्रंथपाल डॉ. अनंतकुमार सरकाळे यांनी केले आहे.

### विटंबना प्रकरणातील मुख्य आरोपीची गळफास घेवून आत्महत्या : जामीनीवर सुटताच संपवले जीवन

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणातील मुख्य आरोपी दत्ता सोपान पवार याने सोमवारी सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली.

त्या घटनेबाबत पवार यास अटक केल्यानंतर पोलिस कोठडीतून न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहातील न्यायालयीन कोठडीत तो होता. ८ जानेवारी रोजी त्याची जामीनावर सुटका झाली. त्याने लगेचच मिर्झापूर हे स्वतःचे गाव गाठले. परंतु, सोमवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास त्याने स्वतःच्या शेतातील आखाड्यावर गळफास घेऊन आत्महत्या केली. दरम्यान, ग्रामीण पोलिसांना ते वृत्त कळाल्या पाठोपाठ, पोलिस अधिकारी घटनास्थळी धावून गेले व पंचनामा करीत पवार यांचा मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान या घटनेबाबत सविस्तर तपशील हाती आला नाही.

### परभणी मनपा मतदानासाठी प्रशासन सज्ज

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महानगरपालिकेसाठी दि.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजतेपर्यंत राहणार आहे. यावेळी नागरिकांनी मतदानासाठी प्रशासनाच्यावतीने सर्व पध्दतीने सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात देण्यात आलेल्या आहेत. दिव्यांगाना व्हीलेचअर, तसेच वयोवृध्द नागरिकांच्या घरोघरी जावून देखील मतदान करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच बुथच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सभामंडप यासह अन्य प्रकारच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. तसेच याठिकाणी मतदान केंद्राच्या परिसरात पोलिसांचा चोख असा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# आभासी स्टेटस पेक्षा आई-वडिलांचे स्टेटस मोठे- बडे

**जिंतूर,/प्रतिनिधी -** काबाडकष्ट करणाऱ्या आई वडील व स्वतःचे स्टेटस ठेवण्याऐवजी युवा पिढी व विद्यार्थी हे आभासी स्टेटस च्या मागे लागल्याने खऱ्या चक्रव्यूहात ही पिढी अडकल्याचे प्रतिपादन पत्रकार तथा व्याख्याते विलास बडे यांनी केले

जिंतूर येथे व्हॉइस ऑफ मीडिया व जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर नगराध्यक्ष प्रताप देशमुख सुंदरलाल सावजी अर्बन कॉपरेटिव बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे नायब तहसीलदार प्रशांत राखे, माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीधर भोंबे, तालुका आरोग्य अधिकारी आबासाहेब जाधव डॉ. दुर्गादास कानडकर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत ज्येष्ठविधीज्ञ मनोज सारडा उद्योजक सचिन तोष्णीवाल ,सुधीरजी शहाणे, बालरोगतज्ञ डॉ. जी जे वाघमारे नगरसेवक अँड गोपाळ रोकडे ,डॉ. प्रकाश अकोसे, मुख्याध्यापक श्रीधर गीते ,माजी नगराध्यक्ष सखाराम चिद्रवार तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शकील अहमद , देवेंद्र भुरे, सत्यनारायण शर्मा, कैलास खंदारे ,भीमराव घुले, सुरेश कुटे ,सुदर्शनअच्छा, राजेश देवकर मनोज राजोतिया, दिलीप देशपांडे रत्नदीप कळमकर ,दामोदर बुधवंत ,सुरेश कुटे आदींची उपस्थिती होती

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रतिनिधी स्वरूपात विनोद पाचपिल्ले ,राजू गारकर प्रशांत मुळी ,प्रभाकर कुरे ,शंकर जाधव यांना १५ लाखाच्या विमा पॉलिसीची वाटप करण्यात आले

यावेळी बोलताना विलास बडे यांनी शेतकऱ्यांना व्यवस्थेने चक्रविवाहात अडकले असून निर्णय प्रशासकीय व्यवस्था ही शेतकऱ्यांना धारातीर्थी पाडण्यास भाग पाडत आहे दुसरीकडे युवा पिढी ही मोबाईलच्या स्टेटस मध्ये बरबाद होत आहे स्वतः चे स्वप्न अर्धवट सोडून आभासी जगात वावरण्याचे काम युवा पिढी करत आहे स्वतःच्या कष्टाच्या घामाचा बाप करीत असलेल्या



कामाचा, आई-वडिलांनी केलेल्या काबाडकष्टाचा स्टेटस असताना, आपण मोबाईलवर स्टेटस कशाचे ठेवत आहोत याचे भान युवा पिढीने व विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे असे सांगत त्यांनी या व्याख्यानाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकलेली युवापिढी व व्यवस्थेच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हेच खरे अभिमन्यू आहेत त्यांना आता यातून बाहेर काढण्यासाठी व्यवस्थेने प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादित केली.

पाहुण्यांचा परिचय प्रा.पांडुरंग निळे, प्रास्ताविक विनोद पाचपिल्ले तर सूत्रसंचालन विजय चोरडिया यांनी केले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिंतूर तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष मंचक देशमुख व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष भागवत चव्हाण, बोरी प्रेस क्लब चे अध्यक्ष आनंद मुरक्या चारठाणा प्रेस क्लबचे अध्यक्ष रघुनाथ गडदे यांनी प्रयत्न केले

**चौकट**

**विभागीय पुरस्कार वितरण**

आजच्या या कार्यक्रमात आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अनिल कसबे व आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार बाबुराव चव्हाण यांना उपस्थित त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तर याच कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांचा नागरी सत्कार करण्यात आला

**चोकट**

**वारकऱ्यांना वाहिली श्रद्धांजली**

तालुक्यामध्ये मुडा येथील ह भ प माऊली दिगंबर कदम महाराज ह भ प प्रसाद राव कदम महाराज ह भ प दत्ता कराळे महाराज यांचे नुकतेच अपघाती निधन झाले होते तालुक्यावर शोककळा पसरलेली असताना कार्यक्रमांमध्ये या तिन्ही महाराजांना सर्व जनसमुदायांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## वंचित बहुजन आघाडी दत्ता डोके यांचा जाहीर प्रवेश

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील व महाराष्ट्रातील होऊ घातलेल्या जिल्हा परिषदा पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीचे श्रद्धे बाळासाहेब आंबेडकर यांचा झंजावत पाहता पालम तालुक्यातील नवयुवक तरुण दत्तराव डोके यांनी दिनांक ११ रोजी जिल्हा अध्यक्ष मनोहर वावळे,पवन करवर, यांच्या नेतृत्वात सर्कल मध्ये जाहीर सभेमध्ये प्रवेश घेतल्यामुळे तमाम विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांना धस्की भरली आहे.




बाळासाहेबांचे स्वप्न वंचित समूहातील वंचित घटकांना पक्षाचे तिकीट देऊन महानगरपालिका नगर परिषदेमध्ये नगरपंचायत नगरसेवक केली आहे. नव युवकांना संधी मिळावी यासाठी मागील वर्षी ओबीसी समूहासाठी ओबीसी बचाव आरक्षण ही रॅली काढून ओबीसी आरक्षणाचा मुद्दा लक्षात घेऊन ओबीसीच्या हक्काचं आरक्षण कोणाच्याही वाट्याला जाणार नाही तसेच गरीब मराठा आरक्षण मिळालं पाहिजे अशी भूमिका घेऊन आपला राजकीय भूमिकेतून चळवळ जिवंत ठेवण्याचे काम केले. ओबीसी मराठा दोन्ही समूहातील वाद रॅलीच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्यात त्यांना यश आले. विविध सभा मोर्चे वंचित पक्षाच्या माध्यमातून ओबीसीसाठी त्यांनी काम केल्यामुळे जिल्हा परिषद गणातील राखीव ओबीसी मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी दत्ता डोके सर यांनी अनेक कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला.

## गणेश काजळे पाटील यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील युवा नेते गणेश काजळे पाटील यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह सोमवारी परभणीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत गणेश काजळे पाटील यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी त्यांच्या समवेत जिंतूर पंचायत समितीचे माजी सभापती वशिष्ट गायकवाड, माजी सदस्य डॉ. विष्णू सानप, भागवत कापूरे, कल्याण इंजे, सुभाष काजळे, भिमराव वाकळे, माधवराव हुलगुंडे, गजानन घुले, हनुमान सांगळे, शेख दिलावर, वैभव डख, मारोतराव मगर, कृष्णा आवरगंड, वैभव काजळे, विशाल दहिवाळ आदींनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, राजू कापसे, महानगर जिल्हाध्यक्ष माणिक पौंढे, माजी खासदार ॲड. सुरेश जाधव, प्रवीण देशमुख आदी उपस्थित होते.




## युवकांनी आपली ऐतिहासिक संस्कृती विसरू नये प्रणव- पटवारी

**मानवत,/प्रतिनिधी-** के. के. एम. महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रणव पटवारी (माजलगाव) उपस्थित होते. यावेळी संचालक संजय लड्डा, श्रीमती संगीता तिवारी (गीता परिवार, मानवत), प्रिती लड्डा, ज्योती खडसे , प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. हुगे व पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना वक्ते प्रणव पटवारी म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा आदर्श राजा घडवून स्वराज्याची बीजे रोवली. त्यांच्या संस्कारांतूनच हिंदवी स्वराज्याची संकल्पना साकार झाली. मातृत्व, राष्ट्रप्रेम, त्याग व नेतृत्वगुण यांचे त्या जिवंत प्रतीक होत्या.

## परभणी मनपा निवडणूकीसाठी आज लक्ष्मी अस्त्राचा वापर होणार?

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महानगरपालिकेसाठी दि.१५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार असून त्याअनुषंगाने प्रशासनाने आपली सर्व तयारी पूर्ण केली आहे. त्यातच दि.१३ जानेवारी व आज दि.१४ जानेवारी रोजी शहरातील एकूण १६ प्रभागामध्ये एकूण प्रभागनिहाय उमेदवारांकडून मोठया प्रमाणावर लक्ष्मी अस्त्राचा वापर होणार असल्याचे चित्र दिसून येत असल्याचा सुर काही जाणकांर नागरिकांतून होवू लागला आहे. त्यामुळे आजच्या या मतदानाच्या पुर्वदिवशी आधी एकूण किती लक्ष्मी अस्त्राचा वापर होतो हे पाहणे देखील कठीण असून नागरिकांना अश प्रकारच्या भुलथांपाना बळी न पडता योग्य उमेदवारास मतदान करावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## जैविक आणि सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शाश्वत विकास होईल -वृक्षमित्र संतोष मुगटकर

**पालम,/प्रतिनिधी-** देशात भविष्यातील पिढींना सुखकर जगण्यासाठी रासायनिक शेतीचा त्याग करून आपण जैविक आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब केलातर देशाचा शाश्वत विकास होईल.मानव जात आजारापासून मुक्त होईल .त्यामुळे सुखी जगण्यासाठी आपण शाश्वत शेतीकडे वळले पाहिजे असे प्रतिपादन वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी दि.११ केले. ते तालुक्यातील जांभूळबेट येथे माधवराव पाटील महाविद्यालय पालम च्या समाजशास्त्र व रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते .




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतिशील शेतकरी प्रकाश नाना सिरस्कार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषीभूषण कांतराव झरीकर,प्राचार्य डॉ . आत्माराम आरसुळे ,डॉ नानासाहेब पाटील यांची मंचावर उपस्थित होती .

या कार्यक्रमात तालुक्यातून आलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना मुगटकर म्हणाले की,भविष्यकाळ हा मानव जातीसाठी चांगला नाही कारण रासायनिक खते आणि औषधांच्या अतिवापरातून भयंकर आजार मानव आणि पशु पक्षांमध्ये पसरत आहेत.त्यामुळे भविष्यातील पिढ्यांना निरोगी जगवायचे असेल तर आपल्याला शाश्वत शेतीचा मार्ग पकडावाच लागेल. यावेळी प्राचार्य डॉ.आरसुळे मार्गदर्शन करताना म्हणाले की,शाश्वत शेतीच्या विकासाचा मार्ग म्हणून जैव रसायन निर्माण करणे आणि त्याचा उपयोग करणे काळाची गरज आहे.त्यासाठी सर्वांनी प्रशिक्षित होऊन आरोग्यदायी शेती करावी असे आवाहन केले .

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ . नानासाहेब पाटील यांनी केले.अध्यक्षीय समारोप प्रकाशराव सिरसकर यांनी केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी तथा माजी सरपंच राम कदम यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. सु.गो. चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास माजी सरपंच राम कदम,संदीप गोळेगावकर ,डॉ मोहन राव ह्यांनी विशेष परिश्रम घेतले.मेळाव्याला प्रकाशराव सीरसकर, अविनाश देशमुख ,कृष्णा भोसले, अनंतराव शिंदे, डॉ वासुदेवराव कदम , मारोतराव शिंदे ,अनिकेत कदम,हनुमंत सुरनर, पांडुरंग चांदणे, अंगदराव सूर्यवंशी,गोविंदराव दुधाटे,शिवराम लांडे,अनिल पौळ ह्यांचा ह्या प्रसंगी विशेष उत्पादन काढल्या बद्दल सत्कार करण्यात आला यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते .

# ज्ञानसाधनेत ज्ञान, क्रीडा व राष्ट्रभक्तीचा त्रिवेणी संगम:महापुरुषांच्या जयंतीच्या पावन पर्वावर 'ज्ञानसाधना खेलरत्न पुरस्कार' जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना प्रतिष्ठान, धर्मापुरी येथे राजमाता राष्ट्रमाता मा. जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वार्षिक क्रीडा सप्ताह व बक्षीस वितरण समारंभ अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किरण सोनटक्के हे उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती. गीता साखरे (जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी), प्रा. चंद्रकांत सातपुते (उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक, संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड), श्री. पंडित चव्हाण (माजी तालुका क्रीडा अधिकारी), सौ. सुरेखा पंडित चव्हाण, श्री. प्रकाश पंडित (कार्यालयीन अधिकारी, जिल्हा क्रीडा विभाग), श्री. शंकर शहाणे (क्रीडा शिक्षक) यांची उपस्थिती लाभली. तसेच संस्थेच्या सचिव मा. सौ. शीतल सोनटक्के, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. शिवछत्रपती महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताच जयघोषाने संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीमय झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. ज्ञानसाधना सुरसागर गीत संचाने सादर केलेल्या जिजाऊ वंदनेने वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत व पोवाड्यांद्वारे महापुरुषांना अभिवादन केले. कु. सुप्रिया शेळके हिने साकारलेल्या जिजाऊंच्या वेशभूषेतील प्रभावी मनोगताने उपस्थितांची मने जिंकली. तर चि. यश जाधव याने स्वामी विवेकानंदांची भूमिका साकारत युवा दिनानिमित्त युवकांना "उठा, जागे व्हा आणि ध्येय पूर्ण होईपर्यंत थांबू नका" हा प्रेरणादायी संदेश दिला.

प्रास्ताविकात मा. सौ. शीतल सोनटक्के यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडून क्रीडा क्षेत्रातील यशस्वी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांना उजाळा देत त्यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी खेळांचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी खेळाडूंना क्रीडा क्षेत्रातील संधी व भविष्यातील वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. प्रा. चंद्रकांत सातपुते व श्री पंडित चव्हाण यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन दिले.

अध्यक्षीय मनोगतात मा. प्रा. किरण सोनटक्के यांनी ज्ञानसाधना प्रतिष्ठान हे भविष्यात सर्व आधुनिक क्रीडा सुविधांनी सुसज्ज असे आदर्श शैक्षणिक व क्रीडा संकुल उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. मोबाईलच्या अतिवापरामुळे खेळापासून दूर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मैदानी खेळांकडे वळविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या समारंभात वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांतील विजयी खेळाडूंना पदके, चषक व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. तसेच क्रीडा शिक्षक व स्टाफसाठी आयोजित विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचेही बक्षीस वितरण करण्यात आले. महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्ञानसाधना प्रतिष्ठानतर्फे यावर्षीपासून 'ज्ञानसाधना खेलरत्न पुरस्कार' सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. या पुरस्कारांतर्गत अंडर-१४, अंडर-१७ व अंडर-१९ या वयोगटांतील प्रत्येकी एक मुलगा व एक मुलगी अशा एकूण सहा विद्यार्थ्यांना दरमहा १,००० रुपये प्रमाणे वार्षिक १२,००० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

यावर्षी हा पुरस्कार पवन सांगळे, पूनम तिथे, सार्थक शिंदे, स्वाती राठोड, अभय शिंदे व विद्या पोळ या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. पुढील प्रत्येक वर्षी अशाच पद्धतीने सहा गुणवंत खेळाडूंना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. एस. खंदारे व कु. अपेक्षा रोडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री अर्जुन चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री भुसारे सर, चव्हाण सर, परडे सर, सिद्धेवाड सर, डाढाळे मॅडम, क्रीडा शिक्षक रासकटला सर, माहुरे सर, लाटे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.



मकरसंक्रांतनिमित्त बीड शहरातील भाजीमंडईमध्ये हळदी कुंकू व वाणाचे साहित्य खरेदी करतांना महिलांची झुंबड उडाली होती.

# निवडणुका कधीही होऊ द्या; मी जनतेच्या सेवेत सदैव तत्पर - राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मौजे करचुंडी येथील शिंदे वस्तीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी आपल्या सेवाभावी कार्याचा आढावा घेत जनतेचा विश्वास असल्याने आगामी निवडणुका कधीही झाल्या तरी विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला.



मी सदैव जनतेच्या थेट संपर्कात आहे. एक फोन आला तरी मी तत्काळ प्रतिसाद देतो आणि अडचणी सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतो. जनसेवेतुन माझं राजकारण आहे. निवडणुकीची मला चिंता नाही, कारण माझं बळ हे जनतेचं प्रेम आणि विश्वास आहे, असं मस्के यांनी सांगितलं.राज्यातील बारा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी बीड जिल्ह्याची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. मस्के यांनी सांगितलं की, निवडणुका आज झाल्या किंवा पुढे कधी ही झाल्या, तरी मी जनसेवेसाठी ३६५ दिवस तत्पर असतो. माझं कार्यच माझा प्रचार आहे.काही लोक निवडणुका जवळ आल्या की पावसाळी छत्र्याप्रमाणे उगवतात आणि मतदारांना प्रलोभन दाखवतात. पण सजग मतदार अशा लोकांवर विश्वास ठेवत नाहीत. जनतेला माझा सेवाभाव आणि विकासाची कृतिशीलता अनुभवायला मिळाली आहे, त्यामुळे विजय माझाच होणार हे निश्चित आहे. करचुंडी येथील शिंदे वस्ती, मोरगाव जाधव वस्ती रस्ता, मुळूकवाडी ते तवले वस्ती पांदण रस्ता अशा वाड्या वस्त्यांना रस्त्याची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे लिंबागणेश जिल्हा परिषद गटात केलेल्या विविध विकासकामांमुळे आणि लोकांशी सातत्याने जोडलेल्या संवादामुळे राजेंद्र मस्के यांच्यावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचं चित्र या भेटीतून स्पष्ट दिसून आलं

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे रासे योजनेचे वार्षिक शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ जानेवारी**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार वार्षिक निवासी शिबिर मौजे रामपिंपळगाव दि. १ ७ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाले.दि. ७ जानेवारी २०२६ रोजी या वार्षिक शिबिराचा समारोप समारंभाचा संपन्न झाला.



सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार वार्षिक शिबीरामध्ये स्वयंसेवक, स्वयंसेविका, ग्रामस्थ व कार्यक्रमाधिकारी यांनी वृक्षारोपण, बंधारा, बालविवाह प्रतिबंध रॅली, स्वच्छता मोहीम, योगा, बौद्धिक सत्र, प्रबोधनपर कार्यक्रम, संस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये दैनंदिन ग्राम स्वच्छता करण्यात येत होती. यावेळी १०० वृक्षाची लागवड गावामध्ये करण्यात आली.

समारोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामेश्वर चाळक होते१ तर प्रमुख वक्ते डॉ. बालाजी बोडके, डॉ. भाऊसाहेब राठोड होते. आश्वामेध लांबूड, रवींद्र लांबूड, मुख्याध्यापक कांबळे, तांबारे सर, ग्रामसेवक तसेच स्वयंसेवक, स्वयंसेविका, ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाजनवाडी- बीड ते अयोध्याधाम श्रीरामनाम रथयात्रा सोहळा प्रस्थान

## भाजपा जिल्हा कार्यालयात भव्य स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक, श्रीराम भक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या संकल्पनेतून,श्रीरामनवमी निमित्त व देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी महाजनवाडी - बीड ते श्री. क्षेत्र अयोध्याधाम नमो श्रीरामनाम रथयात्रा सोहळा काल बीड येथून प्रस्थान झाला.*

आज भाजपा जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ड. सर्जेराव तांदळे, मा. नवनाथ अण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत या रथयात्रेचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी मीराताई गांधले, रामदास बडे, सुंदर चव्हाण, मनोज काका पाटील, भूषण पवार, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, प्रमोद पुसरेकर, प्रीतताई कुकडेजा, कृष्णा तिडके, महादेव नागरगोजे, मनोज काका बांडे, घोलप मामा, भालचंद्र कुलकर्णी, राजेश चरखा यांच्यासह पदाधिकारी व श्रीराम भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा रथयात्रा सोहळा महाजनवाडी - बीड - पैठण - छत्रपती संभाजीनगर - श्रीक्षेत्र घृष्णेश्वर - बुलढाणा - श्री क्षेत्र शेगाव - अकोला- अमरावती- नागपूर- रामटेक - जबलपूर- मैहर- चित्रकूट - श्रीक्षेत्र प्रयाग्रज - श्रीक्षेत्र वाराणसी - श्रीक्षेत्र काशी - आणि अयोध्याधाम असा प्रवासाचा मार्ग असणार आहे.. हा प्रवास ७५ दिवस असून २००० की. मीटरचा आहे.

# स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती बाल सभेतून आयोजित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती विद्यार्थी सहभागातून साजरी करण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित अध्यक्ष म्हणून विश्वजीत गुजर व प्रमुख पाहुणे म्हणून संयोगिता धांडे हे लाभले होते तसेच गोकुळ शिशू वाटिका प्रमुख आरतीताई जोशी होत्या. सर्वप्रथम प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यशवि करे, मनुश्री गायकवाड, सावी गव्हाणे, सिया दुधाने, भाग्यश्री घिगे यांनी जिजाऊ यांची वेशभूषा केली होती व निधीश पांडे, समर्थ पवार हे दोघे स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा करून आलेले होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती व्हावी यासाठी



राजमाता जिजाऊ बद्दल जगदाळे ताई व स्वामी विवेकानंदा बद्दल देशपांडे ताई यांनी माहिती सांगितली. तसेच विद्यार्थ्यांनी देखील हिरीरीने सहभाग घेऊन भाषणे केली देव क्षीरसागर, मृणाल पवार, वेदश्री डाके, मल्हार डाके, प्रांजल यादव, वेदांश बारहाते इत्यादी. सूत्रसंचालन कुबेर कुलकर्णी व आभार दुर्वा परजणे या विद्यार्थिनीने मानले.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना जिजाऊंची व स्वामी विवेकानंदांची प्रतिमा लक्षात आली. कार्यक्रम व्यवस्थित रित्या संपन्न झाला कार्यक्रमासाठी डॉ. सीमा ताई जोशी, ड. अर्चना ताई तुंगार, देशमुख सर, श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांचे सहकार्य लाभले.

# महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ या अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजनाबाबत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

राज्यासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या चड्चए क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम व निर्यातवृद्धीस चालना देण्यासाठी तसेच उद्योगाच्या विकासाकरीता राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना संचालनालया मार्फत राज्यात राबवत आहेत.

सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपिठावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या सहकार्याने महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ या अंतर्गत बीड जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.१३.०१.२०२६ रोजी हॉटेल अन्विता, जालना रोड, बीड येथे सकाळी १०.०० ते ०४.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे, तरी सदर कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व उद्योजकांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी केले आहे.

# पदवीधर मतदारसंघ यादी प्रकाशित जिल्ह्यात ५४२०६ एकूण मतदार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

१ नोव्हेंबर २०२५ अर्हता दिनांक निश्चित करून तयार करण्यात आलेला ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीचे अंतिम प्रकाशन आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मनोज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या यादीमध्ये मसुद्यानुसार ४७१७४ मतदार होते. यात नव्याने ७७१६ नावे वाढविण्यासाठी मतदारांनी अर्ज सादर केले. छाननीनंतर यापैकी ४३६ जणांचे अर्ज अस्विकृत ठरले त्यामुळे ७२८० नावे यादीत सामील करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.यादीतील नावांबाबत ११ आक्षेप दाखल झाले ते सर्व स्विकारण्यात आले आहेत. यादीतून एकूण २४८ नावे वगळण्यात आली आहेत यानंतर अंतिमतः ७०३२ नावे वाढली असून यादीत आता जिल्हयातील मतदारांची एकूण संख्या ५४२०६ इतकी झाली आहे. यात ४२२८२ पुरुष तर ११९२२ महिला व २ इतर मतदार आहेत.

# पुणे आणि पिंपरी चिंचवडचं उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ताकद द्या- ना.अजितदादा पवार

**आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून मराठवाड्यातील मतदारांचा पुण्यात मेळावा**

**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि.१३ जानेवारी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडच उज्वल भवितव्य घडविण्यासाठी आम्हाला तुमच्या पवित्र मताची गरज आहे. त्यामुळे घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हांसमोरील बटन दाबून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ताकद द्या आणि विकासाच्या दिशेने एक ठाम पाऊल टाका असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी केले. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि आयोजनातून झालेल्या मराठवाड्यातील मतदारांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड जिल्हा आणि मराठवाड्यातील मतदारांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आ.रोहीत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून पुणे आणि पिंपरी चिंचवड भागात हजारो लोक स्थायिक झालेले आहेत. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन लढत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ताकद देण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मराठवाड्यातील मतदारांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि हजारो मतदार उपस्थित होते.

# जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वात तीन पिढ्यांची ऊर्जा - प्रा. इंद्रजित भालेराव

## जिजाऊ जयंतीनिमित्त तुलसी समूहातर्फे 'सायकल बँक' या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरूवात; २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

जिजाऊ ज्या कुळात जन्माला आल्या, त्या तीन पिढ्यांमध्ये त्या एकमेव स्त्री होत्या. ना आत्या, ना बहीण, ना मुलगी जणू तीन पिढ्यांची संपूर्ण स्त्रीशक्ती जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वात एकवटली होती. त्याच ऊर्जेतून छत्रपती शिवाजी महाराजांसारखा नररत्न घडला, असे भावस्पर्शी काव्यात्मक विवेचन प्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी केले.

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित व्याख्यान-काव्य मैफिलीत ते बोलत होते. हा कार्यक्रम तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. गणेश वाघ, मा.सोपानराव धुलगुंडे, मा.गणेश सामाले, डॉ.विजयकुमार बांदल, डॉ.अश्विनी बेद्रे, प्रा.डी.जी. निकाळजे, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे तसेच सौ.उमा जगतकर उपस्थित होते.

प्रा.भालेराव यांनी जिजाऊंच्या जीवनावर आधारित विविध काव्यगाणी सादर करून उपस्थितांना भावनिक केले. 'आधी घडवा चरित्र आपुले, मगच घ्या छत्रपतीचे नाव' या ओळींतून जिजाऊंच्या संस्कारांची आणि शिवरायांच्या घडणीत त्यांच्या भूमिकेची प्रभावी मांडणी केली. जिजाऊंच्या जन्मापासून ते शिवाजी महाराजांच्या घडणीतल्या योगदानापर्यंतचा संपूर्ण प्रवास त्यांनी काव्यरूपाने उलगडला. प्रमुख पाहुणे गणेश वाघ यांनी जिजाऊंच्या कार्याचा गौरव केला, तर अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी मुलींच्या सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी सांगितले की, मुलींची ओळख स्वतःच्या कर्तृत्वावर असली पाहिजे. सावित्रीमाई, जिजाऊ, अहिल्यामाता, माता रमाई, फातिमा शेख यांची ओळख त्यांच्या कार्यामुळे आहे. तशीच ओळख आपल्या मुलींनी घडवली पाहिजे. यासाठी स्किल आणि विल या दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत, असे अधोरेखित केले.या कार्यक्रमात जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून प्रा.प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'सायकल बँक' या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. पहिल्या टप्प्यात २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले असून, हा उपक्रम टप्प्याटप्प्याने इतर गरजू मुलींपर्यंत पोहोचवण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अश्विनी बेद्रे, सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे, तर आभार डॉ. विकास वाघमारे यांनी मानले. संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव संघाचे अजात शत्रु व्यक्तीमत्व;आ.प्रकाश दादा सोळंके

माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार, हरितक्रांतीचे प्रणेते आ.प्रकाश दादा सोळंके यांचा आज वाढदिवस आहे.त्यानिमित्त दोन शब्द.

तब्बल चार दशकांपासून माजलगाव मतदार संघाच्या राजकारणात सक्रिय राहुन, येथील जनतेची अहोरात्र सेवा करणारे एकमेव नेतृत्व म्हणजे आ.प्रकाश दादा सोळंके हे आहेत. या ४० वर्षाच्या कारकीर्दीत मतदार संघात विविध पक्षाचे अनेक नेते आले आणि गेले.मात्र कधी विजय झाला तरी आणि कधी पराभव झाला तरीही माजलगाव मतदार संघ न सोडलेले एकमेव नेते आ.दादाच आहेत. राजकारणात अनेक राजकीय चढ-उतार येतात. त्यात तग धरून संयमाने राहणे खुपच अवश्यक असते.ही कला सर्वांनाच जमते असे नाही.मात्र या कलेत आ.दादा हे तावूनसुलाखून निघाले आहेत. त्यामुळेच ते एक दोन नव्हे तर तब्बल ४० वर्षांपासून याच मतदार संघात कायम टिकून तर आहेतच. शिवाय मतदार संघातील जनतेचे विश्वास पात्र नेतृत्व म्हणुन परिचित आहेत. आ.दादांचा राजकीय प्रवास जि.प.सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार, राज्यमंत्री असा आहे.हे सर्व राजकीय पदे भुषवत असताना त्यांनी कधीही गर्व केला नाही.की कधी जनतेशी उद्धटपणाचे वर्तन केले नाही.कायम संयमाची भुमिका घेत लोकांचे प्रश्न जाणून घेत आपले कार्य चालुच ठेवले.आ.दादा हे आमदार होण्यापूर्वी मतदार संघ विकासापासुन कोसो दुर होता.मतदार संघात ना दळणवळणाची सोय होती ना सिंचनाची सोय होती.अगदीच सांगायचे झाले तर मतदार संघातील जनतेला विकास काय असतो हेच माहिती नव्हते.मात्र दादा आमदार झाले आणि पहिल्या पाच वर्षांत मतदार संघातील गावागावात एक एक विकास कामे होऊ लागले.आ.दादांनी मतदार संघात प्रथम दळणवळण व सिंचनाची कामे प्राधान्याने मार्गी लावत मतदार संघात अनेक गावात सिंचनाची विविध कामे करून जमिनी ओलिताखाली आणल्या.तसेच गावोगावचे रस्ते राज्य व राष्ट्रीय महामार्गास जोडल्याने दळणवळण सोयीस्कर झाले. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या.हाताला काम मिळु लागले.तसेच लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या लोकनेते सोळंके साखर कारखान्याच्या माध्यमातुन ऊसउत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक प्रगती आणत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऊसाला रास्त भाव दिला.याशिवाय आ.दादांचा समाजातील चौफेर प्रश्नांचा गाढ अभ्यास असल्याने ते प्रत्येक गावात कुठल्या विकास योजना हवी हे अचूक हेरून, त्या गावात तीच विकास योजना देतात. त्यामुळे तेथील लोकांचा त्यांच्या प्रति विश्वास वाढतच असतो.आ.दादांनी विकास कामात कधीही राजकारणाचा आडपडदा येऊ दिला नाही.विरोधकांच्या गावात ही ते मोठ्या प्रमाणात विकास निधी देतात. त्यामुळे विरोधकांकढे दादांच्या विरोधात कुठलाच ठोस मुद्दा कधीच नसतो.तसेच शेतकरी, कष्टकरी, शेतमजुर, मजुर या सर्वांच्या बाबतीत ही ते नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देत असतात. तसेच मतदार संघात शिक्षणाचे विस्तारीकरण करण्यासाठी ही कायमच प्रयत्नशील असतात. आ.दादा हे मतदार संघातील एकमेव जनतेचे विश्वास पाञ नेतृत्व ठरले.त्यामुळेच ते तब्बल पाच वेळा मतदार संघाचे आमदार म्हणुन विजयी होतात. आज परिस्थितीत राज्य विधिमंडळातील ते सर्वात जेष्ठ आमदार आहेत. आपल्या आमदारकीच्या वीस वर्षाच्या व चालु पंचवार्षिकमध्ये दीड वर्षे असे जवळपास बावीस वर्षाच्याच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी विकासाचा अनुशेष भरून काढत, मतदार संघ विकास प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले.या सर्व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रवासात त्यांना लहान



भाऊ धैर्यशील काका सोळंके यांची कायमच साथ असते.काका हे लक्ष्मणाप्रमाणे मोठे रामा समान बंधु आ.दादा यांच्यासोबत राहुन त्यांना साथ देतात. शिवाय मुलगा चेअरमन विरेंद्र दादा व पुतन्या जयसिंह भैया यांचीही त्यांना कायमच साथ असते.विकासाची चौफेर दुरदृष्टी असलेल्या व विकासाची जाण असलेल्या आ.प्रकाश दादा सोळंके यांना वाढदिवसानिमित्त मन:पुर्वक खुप खुप हार्दिक शुभेच्छा.मतदार संघातील जनतेची सेवा करून, विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना...

**सुरेश लगड**
**सचिव**
लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखाना,लि.सुंदर नगर.



# हिंद-दी-चादर गुरू तेग बहादूर साहिबजी शहीदी समागमनिमित्त बैठक

## जिल्हाधिकाऱ्यांसह शीख बांधवांची प्रमुख उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील रथमार्गाच्या तयारीबाबत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता मंगळवार, (दि.१३) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला.

या बैठकीला जिल्हा प्रशासनातील संबंधित विभागाचे अधिकारी नांदेड क्षेत्रिय समितीचे अशासकीय सदस्य सतवनसिंग चव्हाण, श्रीरंग राठोड, हरनाम सिंह चव्हाण, ॲड. संतोष राठोड, अर्चना राठोड, भोलासिंह दरागा, कृष्णा जाधव, अर्जुन राठोड, लालचंद नेनवाणी, जगजीतराज खुराणा, जीतसिंह साहू यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि नऊ समुदायातील संत महंत आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

बैठकीत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध विभागांना जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. शिक्षण विभागाने हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध स्पर्धांचे आयोजन करावे तसेच या कार्यक्रमाची व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी जनतेमध्ये प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील सिख-सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाज या सर्व नऊ समाजातील भाविकांना नांदेड येथे पोहोचणे, जेवण, राहण्याची व्यवस्था, जाण्या-येण्याचे नियोजन तसेच प्रचार व प्रसिद्धी या सर्व बाबींमध्ये योग्य समन्वय ठेवून सामूहिक जबाबदारी पार पाडावी लागणार असल्याने ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

सर्व नऊ समुदायातील मान्यवरांकडून या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत असून शिक्षण विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर प्रसार व प्रसिद्धी करण्यात येणार आहे. यामध्ये स्टीकर, प्रभात फेरी, शाळांमध्ये सतींदर सिंह यांचा व्हिडीओ दाखविणे तसेच श्री गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या शहीदी समागमाविषयी विविध स्पर्धांचे आयोजन करून व्हिडीओ व छायाचित्रांच्या माध्यमातून प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

# पोलिस पाटील भरतीसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी व वसमत उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर भरती प्रक्रिया अधिकृत संकेतस्थळावर राबविण्यात येणार आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १० वाजता सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत आहे. अर्ज शुल्क खुल्या प्रवर्गासाठी १ हजार रुपये तर मागास प्रवर्गासाठी ८०० रुपये इतके आहे.या पदासाठी उमेदवार एसएससी (इ. १० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक असून संबंधित गावाचा रहिवासी असावा. (वय व अधिवास प्रमाणपत्र आवश्यक).

दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी उमेदवाराचे वय २५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. जाहिरातीनुसार इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

पात्र व अपात्र उमेदवारांची छाननी करून यादी दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांना दिनांक १ फेब्रुवारी २०२६ पासून प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येणार असून उमेदवारांनी ती संकेतस्थळावरून डाउनलोड करून घ्यावीत. लेखी परीक्षा दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

प्रथम उत्तरतालिका दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका व उत्तरतालिकेबाबत लेखी आक्षेप व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर कराव्यात. अंतिम उत्तरतालिका दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याच दिवशी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. कागदपत्र तपासणी व मुलाखती दिनांक ११ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.पोलीस पाटील भरती प्रक्रियेबाबतची सविस्तर जाहिरात संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचूनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदासाठी केवळ विहित संकेतस्थळावरून, विहित पद्धतीने भरलेले अर्ज व निर्धारित शुल्कासह अर्जच ग्राह्य धरले जाणार असून इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी संकेतस्थळास भेट देऊन अद्ययावत माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ग्राहक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**



येथील जिल्हाधिकारी कार्यालय डी. पी. सी. हॉलमध्ये ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तत्पूर्वी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त मान्यवरांच्याहस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ग्राहक दिनानिमित्त मी जागरूक ग्राहक या विषयावर निबंध स्पर्धा शहरातील प्रमुख शाळेमध्ये घेण्यात आली होती. त्यानिमित्त ग्राहक पंचायत महाराष्ट्र हिंगोली यांच्यातर्फे शाळेतून प्रथम, व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, ग्राहक पंचायत महाराष्ट्र हिंगोली चे अध्यक्ष ॲड. राजेंद्र अग्रवाल, जिल्हा सचिव पी.आर. हेंबाडे, प्रसिद्धी प्रमुख डॉक्टर विजय निलावार, संघटक सुभाष लदनीया, सहसचिव एम. एम .राऊत, हिंगोली तालुका सचिव सूर्यकांत राजुलवार, सदस्य माजी मुख्याध्यापक प्रकाश ठाकरे, देवदत्त गव्हाणकर, सांगळे, श्रीमती लीना जाधव. ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे पुरवठा विभागाचे कर्मचारी, शहरातील शाळेतील शिक्षक विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉक्टर विजय निलावार यांनी संचलन केले तर आप्पासाहेब पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



**हिंगोली- मकर संक्रांतीनिमित्त येथील बाजारपेठेत हळदी कुंकू सह विविध प्रकारचे पूजेचे साहीत्य, भाज्या तसेच फळे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आली असून महिलांनी वाणाचे साहीत्य खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केल्याची पहायला मिळत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



हिंगोली- येथील ॲड ग्यानबारावजी शिरसाट संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मध्ये स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक माननीय बल्लाळ सर यांनी युवकांना प्रेरणा देणारे विचार मांडण्यात आले. कार्यक्रमात स्वामी विवेकानंद यांच्या राष्ट्रभक्ती आत्मविश्वास व युवक शक्ती वरील विचारावर व्याख्याने झाली. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या संस्कारक्षम मातृत्वामुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले. दोन्ही थोर व्यक्तिमत्वांनी समाजाला आदर्श दिशा दिली असे मत व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे कविता व नृत्य इ.सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी विवेकानंद व जिजाऊ यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, पर्यवेक्षक कान्हेड, चाटसे, पाईकराव, वाबळे, कान्हेड, पडघन ,मेटकर, ठोके, टेकाळे, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इम्रान व नरवाडे ताईंनी पुढाकार घेतला.

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे जानेवारी, २०२६ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १९ जानेवारी) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

# हिंगोलीत मकर संक्रांतीनिमित्त वाणाच्या साहित्यासाठी महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**

नव्या वर्षातील पहिला सण असलेल्या मकर संक्रांतीनिमित्त मुख्य बाजारपेठ ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेली आहे. यंदा बाजारपेठेत महिलांची मोठी रेलचेल पाहायला मिळत असून, सुवासिनींकडून वाण आणि सौभाग्य लेण्यांच्या खरेदीला उधाण आले आहे.

संक्रांतीच्या वाण पुजनासाठी लागणारी मातीची सुगडं (कुलूपं), तीळ-गूळ आणि इतर साहित्यांनी दुकाने सजली आहेत. विशेषतः शहरातील गांधी चौक, सराफा गल्ली आणि मुख्य बाजार रस्ता परिसरात महिलांची मोठी गर्दी दिसून येत आहे. बांगड्या भरण्यासाठी बांगडी दुकानांवर महिलांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, हिरव्या आणि रंगीबेरंगी बांगड्यांना मोठी मागणी आहे. तसेच 'हळदी-कुंकवा'साठी लागणाऱ्या भेटवस्तू आणि दागिन्यांच्या खरेदीत महिला व्यस्त आहेत. सोने चांदीचे भाव गगनाला भिडले असले तरीही महिलांची दागिने खरेदीसाठी गर्दी होत आहे.

संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर नवीन वस्तू खरेदी करण्याची परंपरा असल्याने, हिंगोलीतील दुचाकी शोरूम्समध्येही गर्दी दिसून येत आहे. अनेक कुटुंब या सणाचे औचित्य साधून नवीन वाहनांची खरेदी करत आहेत, ज्यामुळे ऑटोमोबाईल क्षेत्रात चैतन्याचे वातावरण आहे.

एकीकडे महिलांची खरेदी सुरू असतानाच, दुसरीकडे तरुणाईमध्ये पतंगबाजीची मोठी क्रेझ पाहायला मिळत आहे. शहरातील विविध चौकांमध्ये पतंग आणि मांजा विक्रीची दुकाने थाटली गेली आहेत.

कागदी आणि प्लॅस्टिकच्या विविध आकाराच्या पतंगांनी बाजारपेठ रंगून गेली आहे. पक्क्या मांजाच्या खरेदीसाठी युवकांची दुकानांवर गर्दी होत आहे. पोलिस प्रशासनाकडून नायलॉन मांज्या विक्रीवर करडी नजर ठेवण्यात येत आहे.

# जप्त केलेली वाळू नेण्यास विरोध करणाऱ्या पोलीस पाटलास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**

तालुक्यातील नवखा येथे जप्त केलेली वाळू नेण्यास विरोध करणाऱ्या पोलिस पाटलास मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या येडूद येथील एका व्यक्तीविरोधात हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील नवखा येथे महसूल विभागाच्या पथकाने काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद शाळेजवळ १६ ब्रास वाळू जप्त केली होती. सदर वाळू पोलिस पाटील संतीष पातळे यांना सांभाळण्यासाठी त्यांच्या हवाली करण्यात आली होती.

दरम्यान सोमवारी दि १२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास येडूद येथील विजय मुरलीधरराव घुगे हा तिथे आला. त्याने सदर वाळू भरण्यास सुरूवात केली. मात्र पोलिस पाटील सतीष पातळे यांनी त्याला वाळू नेण्यास मज्जाव केला. सदर वाळू जप्त केलेली असून आपणांस सांभाळण्यासाठी दिली आहे. त्यामुळे वाळू नेता येणार नाही असे सांगत वाळू नेण्यास विरोध केला. यावरून विजय याने त्यांची कॉलर पकडून त्यांना थापडबुक्यांनी मारहाण केली. तू जर मध्ये आडवा आलास तर गाडीच्या चाकाखाली चिरडून टाकील तसेच तुझ्या घरच्यानांही जीवंत सोडणार नाही अशी धमकी देऊन शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

त्यानंतर पोलिस पाटील सतीष पातळे हे घरी जात असतांना त्याच्या घरासमोर जाऊन पुन्हा धक्काबुक्की केली तसेच त्यांच्या आईला शिवीगाळ केली. याप्रकरणी पोलिस पाटील सतीष पातळे यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी विजय घुगे यांच्या विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्यावरून गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक राहुल घुले, जमादार आशिष उंबरकर, बाळासाहेब खोडवे हे पुढील तपास करीत आहेत.

# उद्योजकांनी निर्यात प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी विविध संस्थांची भूमिका समजून घ्यावी- जिल्हाधिकारी गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**




उद्योजकांनी निर्यात प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी बँका, पोस्ट ऑफिस, विमा कंपन्या, कंपनी मैत्री कक्ष, ईओडीबी, डीजीएफटी आदी संस्थांची भूमिका समजून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उपस्थित उद्योजकांना केले.

राज्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, 'एक जिल्हा एक उत्पादन' उपक्रम तसेच निर्यातवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध व्हावी, या उद्देशाने महा-निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६ अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन आज येथील नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यशाळेस उद्योजक संघटनांचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मामडे, नंदु तोष्णीवाल, प्रविण सोनी, रमेश पंडित, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, आर-सेटीचे संचालक हेमराज आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नागपूर येथील डीजीएफटीचे संकेत निनावे यांनी निर्यातीसाठी आवश्यक कागदपत्रे, त्यांची तयारी व निर्यातक्षम वस्तू याबाबत सखोल मार्गदर्शन केले. भारतीय डाक विभागाच्या निर्यातीतील भूमिकेबाबत अधीक्षकीय डाक अधिकारी डॉ. संजय लिये यांनी माहिती देत हिंगोली जिल्ह्यात डाकघर निर्यात केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याचे सांगितले. एडीबीआय बँकेचे विवेक निर्वशवार यांनी बँकिंग सहाय्य व लघुउद्योजक निर्यातदार होण्याबाबत मार्गदर्शन केले. एसबीआयचे नोडल अधिकारी साईनाथ डोगंले व किरण चांदोरकर यांनी ऑनलाईन पद्धतीने एसबीआयची निर्यातविषयक भूमिका स्पष्ट केली. वसमत येथील हळद संशोधन केंद्राचे तांत्रिक अधिकारी निलेश देशमुख यांनी जिल्ह्यातील हळद संशोधनाबाबत माहिती दिली. ईओडीबीचे नोडल अधिकारी आकाश ढगे यांनी उद्योग व निर्यात व्यापार सुलभ करण्याविषयी, तर कंपनी मैत्री कक्षाचे नोडल अधिकारी श्री. हजारे यांनी उद्योगांच्या अडचणी एकाच छताखाली सोडविल्या जातात याबाबत मार्गदर्शन केले. इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या व्यवस्थापक श्रीमती देशपांडे, अग्रणी बँक अधिकारी सुजित झोडगे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्र पत्की यांनी केले तर आभार प्रदर्शन पी. व्ही. मेंढे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक आर. एस. पत्की, विभागीय उद्योग अधिकारी जितेंद्र देशमुख, उद्योग निरीक्षक आर. एल. आहेर, अधीक्षक पी. व्ही. मेंढे, राहुल शेळके, सुधीर आठवले, सुभाष जाधव यांनी योगदान दिले.

या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम व नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह व वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उद्योग केंद्रे, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, संशोधक तसेच बँका व विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी अशा २०० पेक्षा अधिक उद्योजकांची उपस्थिती होती.

# नांदेडच्या विकासासाठी भाजपला बहुमताने विजयी करा : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ जानेवारी-**

नांदेड महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळणी व प्रचार सभा मोठ्या प्रमाणात होत असून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारात हडको येथील शिवाय छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात दिनांक १२ जानेवारी रोजी सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेला संबोधित करताना राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण म्हणाले की नांदेडसह महाराष्ट्रा, मराठवाड्याच्या विकास करावयाचा असेल तर भारतीय जनता पार्टीला बहुमताने विजयी करा असे उपस्थितांना संबोधित केले.

हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात भारतीय जनता पार्टीच्या नांदेड महानगर पालिका उमेदवार निरंजना राजू लांडगे, मंगला गजानन देशमुख, वैजनाथ ईश्वरराव देशमुख, सुवर्ण सतीश बसवते, संजय शिवाजीराव घोगरे यांच्या प्रचारात सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी राजाचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी नांदेड सह मराठवाडा, महाराष्ट्र बरोबरच देशाचा विकास हवा असेल तर भारतीय जनता पार्टीला बहुमताने विजयी करा. नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण झाले आहे यांना मोडून काढण्यासाठी तुमच्या मताची गरज आहे भाजपला आहे तो ताकद येणाऱ्या १५ जानेवारीला मताच्या पेटीतून दाखवून द्या असे आव्हान



केले . प्रभाग क्रमांक १९ व प्रभाग क्रमांक २० या दोन्ही प्रभागातून नवरत्नांना भाजपच्या उमेदवारांना निवडून द्या. मग बघा विकासाची गंगा तुमच्या दारापर्यंत येईल हा अशोकराव चव्हाण चा शब्द आहे. तुम्हाला असे आश्वासन दिले यावेळी भारतीय जनता पार्टीचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की नांदेड शहरात शहर बस सेवा सुरू करणार नाले रस्ते वाढते वीज बिल व पिण्याच्या पाण्याची समस्या यावर नक्कीच आम्ही उपाययोजना करून जनतेला सेवा देऊ असे आश्वासन दिले यावेळी या मंचावर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण डॉ. अजित गोपछडे, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, अमर राजूरकर, दिलीप कंदकुर्ते ,एकनाथ पवार, जनार्दन ठाकूर, संतोष वर्मा, शितल खाडील, डॉ. करुणा जमदाडे, विजय धोंडगे, बालाजी पांडागळे, डॉ.अनिल सातारकर, डॉ. नरेश रायवार, बालाजी पुयड, सिद्धार्थ धुतराज इत्यादींची उपस्थिती होती या सभेचे प्रास्ताविक संजय पाटील घोगरे यांनी केले तर सूत्रसंचालन धीरज स्वामी यांनी केले.

# आ. केराम यांच्या हस्ते लांजी येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यील मौजे लांजी ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते

उत्साहात पार पडला. यावेळी आमदार भीमराव केराम यांनी कामे दर्जेदार करा, आणखी विकास निधी देतो,असे आश्वासन देत तक्रारींना घाबरू नका शासन तुमच्यासोबत आहे. शासन निकषात पात्रतेची चिन्हे दिसत असून लांजी ग्रामपंचायतीचा नक्कीच राज्यात पहिला क्रमांक येईल! असा आशावाद व्यक्त केला.

लांजी येथे दि. १२ जानेवारी रोजी विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याचे आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी तहसीलदार अभिजीत जगताप,

गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांची प्रामुख्याने



उपस्थिती होती. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच मारोती बंडू रेकुलवार हे होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश माचेवार, गटशिक्षण अधिकारी संतोष शेटकार, डॉ.साबळे, गोवर्धन मुंडे, संजय राठोड, डॉ.निरंजन केशवे,आनंद मच्छेवार, वी.आ. लोखंडे, म. आ.

योगिता राठोड, तलाठी सी.पी. बाबर, भाजपा नेते अनिल वाघमारे, भाजपा माहूर शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने,जगन गेडाम,शिवचरण जाधव, बालाजी पवार, गोविंद मगरे पाटील यांचे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रारंभी आमदार भीमराव केराम यांचे हस्ते माँ जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. तदनंतर प्रकाश जाधव यांच्या घरापासून अर्जुन पवार यांच्या शेतापर्यंत एक किलोमीटर खडीकरण (पांदण रस्ता) करणे. तसेच चिरडे यांच्या शेतापासून केशव पोपुलवार यांच्या शेतापर्यंत एक किलोमीटर खडीकरण (पांदण रस्ता) करणे. तसेच यावेळी मग्रारोहयो अंतर्गत सहा कामांचे उद्घाटन देखील करण्यात आले. त्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सीसीटीवी कॅमेरे व सोलार पॅनल इन्वर्टर बॅटरीसह, रेन वॉटर हार्वेस्टिंग आर ओ वॉटर फिल्टर, एटीएम, गावाला लागून असलेल्या स्मशान भूमीचे बांधकाम नरेगा अंतर्गत जलतारा योजनेचे उद्घाटन, तसेच गावासह बायपास रस्त्यावर रस्त्यालगत वृक्षारोपण,अपंगांना मदत धनादेशाचे वितरण यासह विविध विकास कामांचे उद्घाटन यावेळी आमदार केराम यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी साधना तावडे ग्रामपंचायत अधिकारी, लिलाबाई जाधव उपसरपंच, सौ.कोमल जाधव सदस्य,सौ.बबीता पवार सदस्य, रवी पवार सदस्य, संतोष कमटेवार सदस्य यांचे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मुदखेड नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी इम्रान मच्छीवाले बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १३ जानेवारी-**

खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मुदखेड नगर परिषदेत भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक इम्रान मच्छीवाले यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. नगर परिषद सभागृहात आज, १३ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता



नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधव कदम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली. यावेळी मुख्याधिकारी दळवी आणि सर्व नगरसेवक उपस्थित होते. मच्छीवाले यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम, गटनेता सुनील शेटे, माजी उपनगराध्यक्ष माधव कदम, भाजपाचे तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख, भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक रामसिंग चव्हाण, संजय आऊलवार, शाम चंद्रे, उपेंद्र देवदे, अब्दुल सत्तार कुरेशी, नगरसेविका शोभा बल्फेवाड, सविता मोडवान, निकिता सोनटक्के, शांताबाई चमकुरे, अतिया परवीन अ. सलाम, रेखा चौदंते, प्रेमला पांचाळ यांच्यासह नितीन चौदंते, सलाम सर, प्रभाकर पांचाळ, एकबाल कुरेशी, संजय सोनटक्के, प्रकाश बल्फेवाड, संदीप मोडवान, मधू चमकुरे आदी उपस्थित होते.

## मरवाळी तांडा आश्रम शाळेत स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

**नायगाव** -नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेत आज सोमवार, दि. १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता



जिजाऊ माँ साहेब यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळच्या प्रार्थनेनंतर शाळेच्या भव्य प्रांगणात प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात प्रथम स्वामी विवेका नंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हे पूजन प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कुसुम राठोड,माजी पर्यवेक्षक सूर्यकांत जाधव,पोष्ट बेसिकचे प्रा.पांडूरंग येवले,व उच्च माध्यमिक विभागाचे प्रा.गणेश मारताळे कर प्राथमिक विभागाचे साहेबराव येवरेसर उपस्थित होते. यानंतर माध्यमिक विभागातील शिक्षक धोंडीबा तेलंग, संभाजी मेहेत्रे, नागनाथ येल्लूरे, आनंदराव सूर्यवंशी, पांडुरंग जाधव, प्रा. हेमंत बावणे, दिलीप गोरे, बालाजी माळगे, दिलीप माने यांच्यासह सर्व शिक्षक व प्राध्यापकांनी सामूहिक पूजन करून महामानवांना अभिवादन केले. कार्यक्रमात शंकर राठोड यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी देशभक्ती, चारित्र्य, शिक्षण व आत्मविश्वास या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश मारताळेकर यांनी केले. यावेळी आश्रम शाळेतील शिक्षकवृंद व्यंकट रेकूळवाड, सुभाष राठोड, आकाश सूर्यवंशी, गुणवंत कुंदूर्के, सतीश हणमंते, फेरोज शेख, सौ. भारती बन, सौ. कोटलावार, जमिल शेख, रघुनाथ कल्याण, शिवराम राठोड, सुभाष कदम, शिवाजी नारे, व्यंकट पवळे, दीपक बि-हाडे, उत्तम राठोड, हणमंत सिंगवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन जीवनात प्रगती करण्याची प्रेरणा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त संयुक्त कार्यक्रम

**किनवट** -स्वामी विवेकानंद जयंती (युवा दिन) तसेच राजमाता जिजाऊ जयंती निमित्त आमदार भीमराव केराम यांच्या लोकार्पण



जनसंपर्क कार्यालयात संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन (दि.१२) रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांमधून युवकांनी राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरणा घ्यावी, तसेच राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेल्या संस्कारांचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे प्रतिपादन केले. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विवेकानंदांचे विचार मार्गदर्शक ठरतात, तर मातृशक्ती, राष्ट्रभक्ती व संस्कारांची शिकवण राजमाता जिजाऊ यांच्या जीवनातून मिळते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी आमदार भीमराव केराम यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश कुडमते, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, ज्येष्ठ नेते रमेश बद्दीवार, माजी उपसभापती गजानन कोल्हे पाटील, बाळकृष्ण कदम पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुनील मच्छेवार, नागनाथ गेडाम, रामेश्वर पराते, अरुण मडावी, नागभूषण येबरवार, संजय मुरगूलवार, संतोष कनाके, रूपेश दतुलवार, अशोक मडावी, दिनेश गेडाम, अविनाश मेश्राम, सुरेश मडावी, अरविंद पेंदोर, ईश्वर शेडमाके, पिंटू गिनगुले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रम शांततामय व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.



**नांदेड- हदगाव नगर परिषदेच्या नवनिर्वाचित उपाध्यक्षा सुनंदा विलास भोळे यांचा सत्कार करताना खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे स्वीय सहाय्यक विनोद हमणे, शहर प्रमुख राहुल भोळे.**

# नगरपालिकेच्या वाचनालयास माजी आमदार पटणे यांचे नाव देण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. १३ जानेवारी-**

बिलोली शहरातील ज्येष्ठ नेते, ग्रंथ मित्र, माजी आमदार गंगाधरराव महाळप्पा पटणे यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी देहदान केले. गांधीनगर मैदानावर मंगळवारी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. दिवंगत पटणे यांच्या कार्याचे योगदान बिलोलीसह सर्वांना व्हावे यासाठी बिलोली नगर परिषदेच्या सार्वजनिक वाचनालयास माजी आमदार गंगाधरराव पटणे यांचे नाव देण्याचा निर्णय परिषदेच्या वतीने घेण्यात येत असल्याचे नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी सर्व सभागृहाच्या



वतीने शोकसभेत जाहीर केले. त्याबरोबरच दिवंगत माजी आमदार पटणे यांच्या विचारांचा वारसापुढे चालू ठेवण्यासाठी काही उपक्रम राबविण्याचे निर्णय यावेळी जाहीर करण्यात आले.

माजी आमदार गंगाधरराव पटणे यांनी ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून सबंध राज्यभर आपली वेगळी ओळख निर्माण केली त्याबरोबरच धर्मनिरपेक्ष जनता दलाशी एकनिष्ठ राहून आपले राजकीय अस्तित्व अबाधित ठेवले. साने गुरुजी कथामाला, राष्ट्रसेवादल, ग्रंथालय चळवळ, महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे प्रचार व प्रसार करणे या कार्याबरोबरच मराठवाडा तेलंगणा शिमेलगत असलेल्या सीमावर्ती भागात आंतरभारती शिक्षण संस्था स्थापन करून समाजातील गोरगरीब गरजू लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. समाजकारणाबरोबरच राजकारणात सहभागी होऊन बिलोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद, दोन वेळेला आमदारकी, महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्सचे तीन वेळेला संचालक, सेवा सहकारी सोसायटीचे कायम चेअरमन पद यासह बिलोली शहरातील प्रतिष्ठित गांधीनगर गृहनिर्माण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. त्यांचे अकरा जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मागील काही वर्षांपूर्वी त्यांनी निधनानंतर देहदानाचा संकल्प केला होता. त्यामुळे त्यांच्यावर अंत्यसंस्कार न करता त्यांचा देह नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालयातील प्रयोग शाळेत प्रयोग शाळेस दान करण्यात आले. मंगळवारी गांधीनगर सोसायटीच्या मैदानावर शहरवासीयांच्या वतीने सामूहिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम व शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. अनेकांनी माजी आमदार पटणे यांच्या सहवासातील व शैक्षणिक राजकीय सामाजिक कार्याचे दाखले देत विचार व्यक्त केले.

**देहदानाचा धाडसी निर्णय**

आमदार राहीलेले ज्येष्ठ विचारवंत, तत्त्वनिष्ठ राजकारणी, ग्रंथ मित्र ॲड गंगाधरराव पटणे यांनी देहदानाचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्या निर्णयाच्या आड न येता मृत्यूनंतरही कुटुंबातील सर्व सदस्यांनी त्यांनी मृत्यूपूर्वी घेतलेल्या निर्णयास पाठबळ दिले. कुटुंबीयांच्या या निर्णयाचे समाजातील अनेकांनी जाहीर कौतुक केले.

# भारत राठोड यांची परोटीच्या चेअरमनपदी बनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १३ जानेवारी-**

परोटी येथील सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमन पदी भारत व्यंकटराव राठोड याची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली आहे.

परोटी येथील सेवा सहकारी संस्थेच्या पंचवार्षिक निवडणूक इस.सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी येथील चेअरमन व सदस्यांची निवड करण्यासाठी दि. ११ जानेवारी रविवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय व संस्थेचे कार्यालय येथे सर्व सदस्याची बैठक आयोजीत करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये सर्वानुमते परोटी येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी भारत व्यंकटराव राठोड यांची सहाव्यांदा चेअरमन पदी निवड करण्यात आली असून व्हाईस चेअरमनपदी शेषेराव किशन चव्हाण याची देखील बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

तर संचालक मंडळ म्हणून संतोष गणपत राठोड ,किशोर दत्तात्रय जाधव,आनंदराव सवाईराम, उत्तम हिरामण शेषेराव किशन, रेखा रामराव उल्हास रामचंद्र, गणपत परसराम, कुसुमबाई मोहन आडे ,वच्छलाबाई गोविंद आडे शांताबाई सुभाष दासरवाड यांची निवड करण्यात आली आहे.

सदरील निवड प्रक्रिया या संस्थेची निवडणूक कामी निवडणूक निर्णय अधिकारी एस.आर. उसकमवार व संस्थेचे सचिव ए.जी. आलचेट्टीवार यांनी कामकाज पाहिले.

भारत राठोड यांची निवड घोषित होताच सर्व संचालक मडळ व उपस्थित गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

त्यांच्या या निवडी बदल परोटी तांडा गावकऱ्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते, पत्रकार बांधव, बँकेचे कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# उपाध्यक्षपदी सुनंदा भोळे तर स्वीकृत सदस्य पदी अजय सूर्यवंशी, नामदेव वाकोडे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १३ जानेवारी-**

हदगाव नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी व स्वीकृत सदस्य पदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता सबंध शहरवासीयांना लागली होती त्यातच शिवसेना (उबाटा) व कॉंग्रेस पक्षाची युती होऊन प्रभाग क्र.५ चे विजयी उमेदवार सुनंदाताई विलासराव भोळे यांची हदगाव नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी (१२ मते) निवड झाली असून स्वीकृत सदस्य पदी कॉंग्रेस- शिवसेना (उबाठा )गटाचे अजय सूर्यवंशी तर शिवसेना शिंदे गटाचे व भाजपा या महायुतीचे नामदेव वाकोडे यांची निवड झाली. सदरील निवड प्रक्रिया ही पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष रोहिणीताई भास्करदादा वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली तर अर्ज स्वीकारणे, छाननी करणे इत्यादी कार्य मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी पार



पडले.

हदगाव नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड प्रक्रियेत शिवसेना उबाठा - कॉंग्रेसच्या उमेदवार म्हणून सुनंदा विलास भोळे यांनी अर्ज भरला असतात त्यांना एकूण १२ मते पडली तर महायुतीकडून उमेदवार असलेल्या अरुणाबाई काळे यांना ९ मते पडली तर स्वीकृत सदस्य पदी कॉंग्रेस व शिवसेना उबाटा गटाकडून माजी आमदार जवळगावकर यांचे स्वीय सहाय्यक अजय सूर्यवंशी यांची निवड झाली असून शिवसेना शिंदे गट भाजपा या महायुतीकडून नामदेव वाकोडे यांची स्वीकृत सदस्य पदी निवड झाली उपाध्यक्षपदी निवडीच्या वेळेस खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधणारी ठरली होती तर विजयी उमेदवारांच्या समर्थकांकडून आतिषबाजी ढोल ताशांच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला. सदरील निवडीच्या प्रक्रियेत हदगाव नगरपरिषद चे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गोरठेकर घराण्याने दिलेला वचननामा पाच वर्षात पुर्ण करू : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. १३ जानेवारी-**

गोरठेकर बंधूनी जे उमरी शहरात नगर परिषदेवर सत्ता आनुन प्रताप दाखविला हा प्रताप उमरी च्या विकासाठी निधी कमी पडू देणार नाही असे उद्गार आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी उमरी नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष नगरसेवक पदग्रहण सोहळ्यात बोलत होते .

या सोहळ्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून शिवराज पा . होटाळकर , बालाजी रावणगावकर , मिनाशी कागडे , सुभाष देशमुख गोरठेकर (नाना ) , ड भाऊसाहेब देशमुख गोरठेकर , कृषी उत्पन्न बाजर समिती सभापती शिरीष देशमुख गोरठेकर , केडी बॉस कैलास देशमुख गोरठेकर ,माजी नगराध्यक्ष प्रविण भाऊ सारडा , गणेश गाढे सर , जि प सदस्य प्र आनंदा यलमगोंडे ,प्रल्हाद पा इज्जतगावकर , शिवाजी पा . कार्लेकर , बालाजी पा हातणीकर '

मुख्य नगरपरिषद अध्यक्ष सौ शकुंतला भगवान मुदिराज , उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर , नगर परिषद गटनेते



राजेश जाधव , स्विकृत सदस्य म्हणून कायदे पंडित माजी नगराधक्ष प्रविण सारडा , दुसरे सदस्य - माजी नगरसेवक एजाज खॉन यांच्या सह सर्व नगरसेकक यांचा पदग्रहन सोहळा पार पडला आहे .

यावेळी प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले उपमुख्यमंत्री अजिदादा पवार कडे अर्थ खात्यासह इतर खाते आहेत त्यामुळे उमरी नगर परिषेदेला विकास कमी पडू देणार नाही नांदेड जिल्हात उमरी नगरपरिषद ग्लोबल शिटी म्हणून ओखळ निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत त्या करित गोरठेकर बंधूनी निवडणूकीत जे वचन नामा राष्ट्रवादी पक्षाकडून दिला ते पुर्ण पाच वर्षात तर करूच या घराण्याची परंपरा आहे की चुकीला चुक म्हणणे खऱ्याला खरे बोलणे आन्यावर तुटून पडणे शब्दाला जागणारे घराणे असल्याने उमरी मतदार जनता जिल्ह्यात एक पसतीची टक्केवारी देवून कै . बापूसाहेब देशमुख यांचे स्वप्न पुर्ण केले त्या बद्दल उमरी मतदार यांचे आभार मानले व गोरठेकर आणि प्रताप पाटील चिखलीकर यांचे ऋणानुबंधन कसे आहे त्याला उजळा दिला आणि कैलास देशमुख गोरठेकर , शिरीष देशमुख गोरठेकर हि तिसरी राजकीय पीडी परंमपरेला तडा जावू देणार नाहीत ही श्वासवती देली असून सदैव गोरठेकर घराण्याच्या पाठीशी राहीन असे अभिवचन दिले आहे . यावेळी प्रतापवराव पा चिखलीकर यांनी सुनिल तटकरे यांच्या सहीनीशी पत्र देवून शिरीष देशमुख हे महाराष्ट्र राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याचे घोषीत करून सर्वानां शुभेच्छा दिल्या आहेत .

कैलास गोरठेकर म्हणाले की माझे वडिल कै आ बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या निधना नंतर आमच्या घराण्यावर जनतेने विश्वास दाखवून मला उपनराध्यक्ष पदी बसविले जनताच माझे माय -बाप असल्याचे बोलून जर नगर परिषदे मध्ये एकाही पैसाचा भष्ट्रार झाल्यास राजकीय पदाचा राजीनामा देणार असल्यासे बोलून दाखविले .

सभापती शिरीष देशमुख गोरठेकर म्हणाले की वडिलानी जशा राजकीय वारस चालवला त्याच धरतीवर आम्ही दोघे बंधू राजकारणात वागू वडिलांनी दिलेली शिकवणी चा तडा जावू देणार नाही पुर्वी तालुका हा गोरठेकर घराण्याचा बाल्लेकिल्ला म्हणून ओळख आहे पुन्हा आम्हा तिसऱ्या पिडीलाही आशीर्वाद देवून सत्तेचे संधी दिली ते कैलास गोरठेकर व सर्व नगरसेवक संधीचे सोने पाच वर्षात करून देतिल गोरठेकर घराण्याची रित आहे सत्ताधारी असो की विरोद्धक हे भेदभाव - पक्षपात न करता सर्व विसरून नगरपरिषदेची पहिली पायरी चढल्यास विकास कामे ,समस्य सोडवण्याची ताकद पुर्वीपासुनच गोरठेकर घराण्यात आहे तीच पद्धत परंपरा या नगरपरिषदेत मार्मृला वापरला जाईल असे ही बोलत शिरीष देशमुख गोरठेकर यांनी ननिर्वाचित नगराध्यक्ष - उपनगराध्यक्ष , नगरसेकक यांना महत्वाचे सल्ले दिले आहेत या वेळी आ. प्रतापराव पा चिखलीकर (काका ) यांना लाल दिव्याची गाडी म्हणजे मंत्रीपद मिळेल अशी अपेक्षा आहे तशा हालचाली सुरू झाल्याचा राजकीय स्फोट गोरठेकर शिरीष यांनी केला आहे . पत्रग्रहण सोहळ्याच्या अगोदर सर्व शहरातील संताच्या समाधीचे दर्शन व महापुरुषांना अभिवादन करण्यात आले हा सोहळा पार पडला आहे जि प पं समिती ची तालीम म्हणून फटाक्या च्या अतिषबाजीत हा राजकीय सोहळा रंगतदार संपन्न झाला आहे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर कवडीकर यांनी केले तर आभार न .पा गटनेते राजेश जाधव यांनी मानले .